


साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक १७ | बुधवार, दि.०३ एप्रिल २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## मेंढे,पडोळे,कुंभलकर यांच्यात तिरंगी लढतीचे चित्र

### निवडणूक रिंगणात १८ उमेदवार



**गोंदिया:** भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी ४ उमेदवारांनी नामांकन अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता १८ उमेदवार रिंगणात असून भाजपचे सुनील मेंढे, काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे, बसपाचे संजय कुंभलकर यांच्यात तिहेरी लढत होण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीसाठी एकुण ४० उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. त्यापैकी छानणीत १८ उमेदवारांचे नामांकन अवैध ठरले. २२ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले. शनिवारी (दि.३०) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे १८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेणाऱ्यांमध्ये अपक्ष अरुण गजभिये, मुनीश्वर काटेखाये, डॉ. सुहान फुंडे, सोमदत्त करंजेकर यांचा समावेश आहे.

पवनी तालुका राईस मिल संघटनेचे अध्यक्ष मुनीश्वर काटेखाये यांनी अर्ज मागे घेत बसपाचे उमेदवार संजय कुंभलकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

**रिंगणातील उमेदवार:** निवडणूक रिंगणात सुनील मेंढे (भाजप), डॉ. प्रशांत यादवराव पडोळे (काँग्रेस), संजय कुंभलकर (बसपा), अजयकुमार भारती (अखिल भारतीय परिवार पार्टी), देवीलाल नेपाळे (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रेटीक), विलास लेंडे (लोकस्वराज्य पक्ष), संजय केवट (वंचित बहुजन आघाडी) तर अपक्ष डॉ. आकाश जिभकाटे, शरद इटवले, चैतराम कोकासे, तुळशीराम गेडाम, प्रदीप ढोबळे, बेनिराम फुलबांधे, वीरेंद्रकुमार जायस्वाल, विलास राऊत, सुमित पांडे, सूर्यकिरण नंदागवळी, सेवक वाघाये असे १८ उमेदवार आहेत.

#### सभापती स्वाती वाघाये कुणाचा प्रचार करणार

**जिल्हा परिषद निवडणुकीत आ.नाना पटोले यांनी स्वाती नरेंद्र वाघाये यांना काँग्रेसची उमेदवारी दिली. निवडून आल्यानंतर त्यांना सभापतीपद दिले. आता त्यांच्या कुटुंबातील सेवक वाघाये हे लोकसभा निवडणूक लढत आहेत. त्यामुळे सभापती वाघाये काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांचा प्रचार करणार की, कुटुंबातील अपक्ष उमेदवाराचा प्रचार करणार?याकडे जनतेचे लक्ष लागून आहे.**

#### बसपाकडून कुंभलकर

**तेली समाजाला उमेदवारी द्या अन्यथा उमेदवार पाडू, असा निर्वाणीचा इशारा देऊन आपल्या समाजाचा उमेदवार ज्या पक्षातून लढेल त्यांना पाठिंबा द्या, असा निर्णय तेली महासंघाने लाखनी येथील मेळाव्यात घेतला होता.त्या पार्श्वभुमीवर सर्वच पक्षांनी तेली समाजाकडे दुर्लक्ष केल्याने भाजपचे तत्कालीन महामंत्री तथा माजी नगरसेवक संजय कुंभलकर बसपाकडून निवडणूक लढत आहेत.आता तैलिक महासंघ त्यांना कितपत साथ देत हे कळेलच.**

## वाघाये,पडोळेमुळे काँग्रेस अन् भाजपची अडचण वाढणार



भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील निवडणुक प्रारंभी भाजप आणि काँग्रेस अशी थेट वाटणारी लढत आता बसपा आणि अपक्ष उमेदवार सेवक वाघाये यांच्या उमेदवारीमुळे रंगतदार होणार आहे.यासोबतच वंचित बहुजन आघाडीचाही तेवढाच विचार करावा लागणार आहे. या मतदारसंघात महायुतीकडून भाजपचे सुनील मेंढे, काँग्रेसकडून डॉ.प्रशांत पडोळे, बसपाकडून संजय कुंभलकर आणि वंचित बहुजन आघाडीकडून संजय केवट रिंगणात आहेत. माजी आमदार सेवक वाघाये यांनी अपक्ष रिंगणात उडी घेतली आहे.

विशेष म्हणजे या निवडणुकीत ओबीसी समाजाकरीता सातत्याने लढा देणारे विचारवंत व ओबीसी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष इंजि.प्रदिप पडोळे यांनीही रिंगणात उडी घेतली आहे.वंचित आघाडीकडून उमेदवारी मिळेल या आशेवर होते.परंतु वंचितने केवट यांना उमेदवारी दिल्यानंतर ढोबळे यांनी ओबीसी समाजाचे आंदोलन भंडारा-गोंदियात प्रभावी असल्याचे लक्षात घेत रिंगणात उडी घेतली आहे.यात त्यांना अल्पावधीत कशी मदत चळवळीच्या कार्यकर्त्यांकडून होते यावर बरेच काही अवलंबून राहणार आहे.

भाजपने विद्यमान खासदारांना तिकीट देऊन परिचित चेहरा दिला असताना काँग्रेसने डॉ. पडोळे यांच्या रुपाने तरुण आणि नवा चेहरा पुढे केला आहे. नामांकनाच्या दिवशी शक्तीप्रदर्शनात या नव्या चेहऱ्याने मजल मारलेली दिसती. त्यामुळे दुरंगी लढत होणार अशी चर्चा रंगली असतानाच बसपाने संजय कुंभलकर यांच्या रुपयाने तैलिक समाजातील चेहरा पुढे केला. नामांकन परत घेण्याच्या अखेरच्या दिवशी सोमदास करंजेकर आणि मुश्विर बोरकर यांनी माघार घेतली. आता बोरकर कुंभलकरांच्या मंचावर पोहोचले आहेत.

वंचित बहुजन आघाडीनेही संजय केवट या तरुणाला उमेदवारी देऊन नवा चेहरा पुढे केला आहे. पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे असणारे माजी आमदार सेवक वाघाये यांनीही काँग्रेसविरुद्ध दंड थोपटून आमली उमेदवारी कायम ठेवली आहे. या अपक्ष उमेदवारामुळे भाजप तसेच काँग्रेसच्या अडचणी वाढणार यात शंका नाही.

## कुंजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह



**देवरी:-** तालुक्यातील पालांदूर जमीपासून १ किमी अंतरावर असलेल्या जंगलात वाघाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला. ही घटना शुक्रवारी (दि.२९) रात्रीच्या सुमारास उघडकीस आली. मृत वाघाचे अवयव घटनास्थळापासून तब्बल शंभर ते दीडशे फुटापर्यंत पसरलेले होते.त्यामुळे वाघाचा नैसर्गिक मृत्यु की शिकार याचे गुढ कायम आहे.

देवरी तालुक्यातील पालांदूर जमीपासून १ किमी अंतरावरील जंगलातील कक्ष क्रमांक ९८ मध्ये २९ मार्च रोजी सायंकाळी गस्त घालत असलेल्या वनरक्षकाला दुर्गंधी आली. त्या दुर्गंधीच्या दिशेने ते गेल्यावर त्यांना वाघ कुजलेल्या अवस्थेत आढळला. त्यांनी ही बाब वरिष्ठांना कळविली. ३० मार्च रोजी पालांदूर जमी येथील घटनास्थळ गाठून त्या भागाची पाहणी केली. या ठिकाणी कुजलेल्या अवस्थेत वाघ दिसला.

त्या वाघाचे अवयव घटनास्थळापासून शंभर ते दीडशे फुटांवर आढळले. मृत पावलेल्या वाघाचे इतर प्राण्यांनी लचके तोडले असावे असा कयास लावला जात आहे.उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई, नागपूरच्या गोरेवाडा येथील रेस्क्यू टीमचे डॉ. सुजीत कोलंगत, देवरी येथील पशूधन विकास अधिकारी डॉ. पारधी, वन्यजीव मानद रक्षक मुकूंद धुर्वे, वन्यप्रेमेमी सावन बहेकार यांनी घटनास्थळ गाठून त्या वाघाचे अवयवाचे नमुने घेतले. ते प्रयोगशाळेत पाठविले.

#### मृत्यूचे कारण अस्पष्ट्च

**कुजलेल्या अवस्थेत आढळलेल्या वाघाची शिकार झाली की वन्यप्राण्यांचा एकमेकांवरील हल्ला झाला. किंवा म्हातारपणामुळे त्या वाघाचा मृत्यू झाला ही बाब अद्याप स्पष्ट झाली नाही. वाघाचे अवय शंभर ते दिडशे फुटांवर पसरले होते.परंतु जे अवयव लांब मिळाले त्यात हाताचे पंजे,नख साबूत असल्याची माहिती आहे.**

#### विषबाधा किंवा करंटने तर मृत्यू नाही ना?

**वन्यप्राण्यांच्या शिकारीसाठी विषबाधा केली जाते.किंवा करंट लावून वन्यप्राण्यांची शिकार केली जाते. यातील तर हा प्रकार नाही ना? रानडुकरांच्या शिकारीसाठी करंट लावला अनं वाघाचा मृत्यू झाला अशी तर ही घटना नाही,या सर्व दृष्टीने तपास वनविभागाकडून केला जात असल्याचे उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई यांनी सांगितले. उत्तरीय तपासणी अहवाल येईपर्यंत वाघाचा मृत्यू कशाने झाला हे सांगता येत नाही असे त्यांनी म्हटले.**

#### घटनास्थळाजवळ पाला-पाचोळा जळालेला

**आता मोहफुल वेचन्याचे काम जोमात आहे. मोहफुल वेचण्यासाठी काही लोकांनी झाडाखाली आग लाऊन मोहफुल वेचण्यासाठी पालापाचोळा जाळण्यात आला होता. म्हणजेच त्या ठिकाणी नागरिकांचा वावर आहे. त्यांना यापूवी वाघ दिसला किंवा नाही याची पडताळणी केली जात आहे.**

#### कॅमेऱ्यात वाघ आलाच नाही

**वन्यप्राण्याचे वावर असलेल्या या ठिकाणी वन्यप्राण्यांच्या हालचाली टिपण्यासाठी कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परंतु या कॅमेऱ्यात बिबट कैद झाला आहे मात्र वाघ कैद झाला नव्हता. तो वाघ कुठून आला, बिबट आणि वाघाचे युध्द तर झाले नाही? किंवा म्हातारपणामुळे शिकार न करू शकणाऱ्या वाघाचा भुकेने व्याकूळ होऊन तर मृत्यू झाला नाही ना अशी शंका येत आहे.**

## आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे-जिल्हाधिकारी

**गोंदिया :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार लोकसभा निवडणूक भयमुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणांनी संवेदनशीलपणे कामे करुन आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व नोडल अधिकाऱ्यांची बैठक घेवून निवडणुकीसंदर्भात माहिती दिली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे नोडल अधिकारी एम. मुरुगानंथम, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर जिल्हाधिकारी घनश्याम भूगावकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर यांचेसह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

## काँग्रेसच्या नवख्याकडून अपेक्षा कमी तर भाजपच्या अनुभवी उमेदवाराकडून अपेक्षाभंग!

### *अनेक सुजाण नागरिक नव्या पर्यायाच्या शोधात



**गोंदिया-** भंडारा- गोंदिया लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात झाली असून सगळेच पक्षाचे कार्यकर्ते आपलाच उमेदवार श्रेष्ठ असल्याची बतावणी करीत आहेत. मुख्य लढत भाजप व काँग्रेस च्या उमेदवारांमध्ये होणार हे निश्चित. असे असले तरी काँग्रेसने नवख्या उमेदवाराला निवडणुकीच्या रिंगणात उतरवल्याने त्यांच्याकडून क्षेत्राच्या विकासाच्या अपेक्षा या कमीच तर भाजपने पुन्हा संधी दिलेल्या उमेदवाराने मागील पाच वर्षात हवे तसे काम केले नसल्याने जनसामान्यांचा अपेक्षाभंग झाल्याने अनेक सुजाण नागरिक नवीन उमेदवाराचा पर्याय शोधत असल्याचे जाणवत आहे.त्यातही काँग्रेस उमेदवार काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना काकाजी म्हणतील तसेच मी करणार या दोनचार ओळीतच आपले म्हणने सादर करीत असल्याने मतदारासमोर परखड ते भूमिका मांडू शकत नाही,हे सुध्दा दिसून येत आहे.

भंडारा - गोंदिया लोकसभा निवडणुक नेहमीच चर्चेत राहत असते.या क्षेत्रातून अनेक मातब्बर मंडळी आपले किस्मत आजमावत असतात.मात्र यावेळी अपेक्षेप्रमाणे या ठिकाणी लढत होत नसल्याचे अनेक मतदारांनी बोलून दाखविले.काँग्रेसने यावेळी नवख्या डॉ. प्रशांत यादराव पडोळे यांच्यावर विश्वास दाखविला आहे.ते उच्चशिक्षित असून नवीन चेहरा असल्याचे काँग्रेसचे कार्यकर्ते सांगत आहेत.असे असले तरी मागील काही वर्षांपासून त्यांचे कामे बघता यावेळी जरी निवडणुकीत बाजी मारली तरी या लोकसभा मतदार संघातील नागरिकांच्या अपेक्षेवर ते कितपत खरे उतरणार हे काळच सांगेल.एकंदरीत काय तर काँग्रेसच्या उमेदवाराकडून नागरिकांना विकासाच्या अपेक्षा या नगण्यच आहेत.

दुसरीकडे भाजपने यावेळी पुन्हा विद्यमान खासदार सुनील मेंढे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजप उमेदवार सुनील मेंढे यांनी मागील ५ वर्षांत ठोस अशी कोणतीच कामे लोकसभा मतदार संघासाठी केलेली नाही. विशेष म्हणजे या पाच वर्षांत ते अनेक गावात अजूनही पोहचू शकले नाही. एकंदरीत काय तर भाजपच्या या उमेदवाराने पाच वर्षांत मतदार क्षेत्रातील नागरिकांच्या अपेक्षाभंगच केलेला असल्याने आता पुन्हा त्यांना संधी देणे कितपत योग्य ठरणार असा सवाल सुजाण मतदार उपस्थित करीत आहेत.

त्यातच भाजपच्याच अनेक कार्यकर्त्यांनी व पदाधिकारी यांनी मेंढे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त करीत कधी आमच्याशी संपर्क केला नाही,की आम्हाला काही मदत केली असे खासदाराकडून काहीच झाले नसल्याचे बोलत आहेत.एकंदरीत पक्षाच्या दावणीला बांधलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मनात मात्र आपलाच उमेदवार जिंकावा यासाठी प्रयत्न चालू आहेत. असले तरी खरच दोन्ही पक्षांचे उमेदवार हे या क्षेत्राच्या विकासासाठी कितपत ठरणार की नवीन उमेदवाराला संधी देणार असा प्रश्न या क्षेत्रातील सुजाण व तज्ज्ञ नागरिकांना पडला आहे.

#### विद्यमान खासदाराला कोसमतोंडीत फटकारले

**भंडारा-गोंदियाचे खासदार व विद्यमान उमेदवार सुनिल मेंढे यांनी गेल्या पाच वर्षात गावपातळीवर कार्यकर्त्यांशी संबध न ठेवल्याने व त्यांच्या गावातील समस्या न सोडवल्याने गावागावात मेंढेविरुध्द मोठ्याप्रमाणात भाजपमध्येच रोष दिसून येत आहे.सडक अर्जुनी तालुक्यातील कोसमतोंडी येथे गेले असता लोडशेडींग व कोसमतोंडी मुरपार रस्त्याच्या प्रश्नावर भडीमार केल्याने मेंढेवर चांगलीच नामुष्की ओढवल्याचे वृत्त आहे.त्यासोबतच गोंदिया तालुक्यातील नागरा येथील एका कार्यक्रमाकरीता मदत करण्याचे आश्वासन दिले होते,परंतु तिथे मदतच न दिल्याने तेथील कार्यकर्त्यांनी सुध्दा चांगलेच फटकारल्याचे वृत्त आहे.भंडारा शहरात नगराध्यक्ष पद आपल्या हाती ठेवूनही शुध्द पिण्याचे पाणी पुरवठा करू शकले नसल्याने आजही गढूळ पाणी पुरवठा होत असल्याने तेथील नागरिकांतही मेंढेविरुध्द रोष दिसून येत आहे.**

## केंद्रीय गृहमंत्री शहांची शनिवारला गोंदियात जाहीर सभा



**गोंदिया :** भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ६ एप्रिल रोजी गोंदिया जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

यादरम्यान ते भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारार्थ दुपारी ३.३० वाजता शहरातील बालाघाट टी-पाईट मोदी ग्राऊंडवर आयोजित भव्य जाहीर सभेला मार्गदर्शन करणार आहे. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते खा. प्रफुल्ल पटेल यांच्यासह खासदार, आमदार व महायुतीतील पदाधिकारी आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

## बालाघाट जिल्ह्यात पोलीस-नक्षल चकमक,दोन नक्षलवादी ठार

**गोंदिया :** शेजारील मध्यप्रदेश राज्यात सुरू असलेल्या नक्षल निर्मूलन मोहिमेत सहभागी जवानांना मोठे यश मिळाले आहे. मध्यप्रदेश आणि छत्तीसगडच्या सीमेला लागून असलेल्या केरझारी नक्षलग्रस्त भागात बालाघाट पोलिसांनी सोमवारच्या मध्यरात्री दोन नक्षलवाद्यांचा खात्मा केला. ठार नक्षलवाद्यांच्या मृतदेहाजवळून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला आहे.

काही भागात आणखी नक्षलवादी असण्याची शक्यता असून तेथे चकमक सुरू आहे.सोमवारी मध्यरात्री १० ते १२ च्या दरम्यान मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या सीमेवरील बालाघाट जवळील केरझरी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. घटनास्थळी शोधमोहीम राबवली जात आहे. मंगळवारी पहाटे पोलिसांना दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले. यामध्ये नक्षलवादी नेता डीव्हीसीएम सजंती उर्फ क्रांती, यावर मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये २९ लाख रुपयांचे बक्षीस होते.नक्षलवादी रघू उर्फ शेरसिंग एसीएम, यावर १४ लाख रुपयांचे बक्षीस होते.या मृत नक्षलवाद्यांकडून एक एके-४७, एक बारा बोअर रायफल आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू जप्त करण्यात आल्याचे बालाघाटचे जिल्हा पोलीस अधीक्षक समीर सौरभ यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राज्यांच्या सीमेवर होणाऱ्या संशयास्पद हालचालींवरही पोलिसांची नजर आहे. दरम्यान, जंगलात काही नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली असता त्याना मोठे यश मिळाले.लोकसभा निवडणुकीपूर्वी पोलीस नक्षलवादाचे कंबरडे मोडण्यात व्यस्त आहेत.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनीही परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवला आहे.

## तलाव जिवंत करतात त्या रणरागिणी, दहा वर्षांपासून कार्य सुरु



**अर्जुनी मोरगाव:** पुर्वापार चालत असलेल्या मत्स्य व्यवसाय हा तसा पुरुषांचाच, मासेमारीच्या वेळी पाणी आणून देण्याचे काम केवळ विधवा महिला करायच्या. परंतु पैशांच्या भागीदारीत त्यांचा समावेश नसायचा. केवळ दैनिक मजुरी मिळायची. या क्षेत्रात केवळ पुरुषी मक्तेदारी होती. प्रत्येक क्षेत्रात महिलांना ५० टक्के भागीदारीचा निर्णय शासन घेत असले तर मत्स्य व्यासायात महिलांचा सहभाग का नाही? या ध्येयाने शालू कोल्हे, कविता मौजे व सरिता मेश्राम या महिला पेटून उठल्या आणि चक्क तलावाच्या पाण्यात उतरुन त्यांनी मत्स्य व्यसायाची सुरुवात केली.

पूर्व विदर्भातील गोंदिया-भंडारा या जिल्ह्यांची तलावाचे जिल्हे अशी ओळख आहे. वंशपरांपरागत वर्षानुवर्षापासून ढीवर समुदाय मासेमारीचा व्यवसाय करतो. नव्हेतर मसेमारी हाच त्यांच्या उदरनिर्वाहाचा साधन आहे. या व्यवसायात प्रत्येक कुटुंबातील पुरुष व्यक्ती गुंतले असयाचे, मासे, तलावातील वनस्पती व पक्षी यांची ओळख जैवविधितेचे तज्ज्ञ मनीष रांजणकर, पतिराम तुमसरे व नंदलाल मेश्राम यांनी दिली.

अगदी सुरुवातीला निमगाव, सावरटोला, बोरटोला, येलोडी, जांभळी व गंधारी जांभळी या पाच गावात प्रत्येकी १६ महिलांचे गट तयार केले. नागपूरच्या फिशरी सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य स्वप्निल गाडगीळ व मनीष रांजणकर यांच्याकडून २० दिवसात जिरेपासून बोटुकली तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले. आमच्याकडे सुरुवातीला तलाव नव्हते ते संस्थांकडे असायचे. पण तलाव नसतानाही केज व पेनच्या माध्यमातून ग्रीन नेट, बांबू आणि ड्रमचा वापर करुन मत्स्य जिऱ्यांना मोठे करण्याची संकल्पना कळली. अगदी कमी पैशात जास्त उत्पन्न घेण्यासाठी ६० बाय ३० आकाराचे पाण्यात पेन तयार केले. त्यात मत्स्य जिरेचे बीज घातले. बोटुकली तयार झाली. कालांतराने त्याचे मोठे मासे झाले.

तलावातील मासे कधी पकडले नव्हते. पण यात पुरुषांचे सहकार्य घ्यायचेच नाही असे ठरवले होते. सुरुवातीला तलावात पाय ठेवायला भीती वाटायची. प्रारंभी मोठा निर्धार करुन आम्ही सर्व महिला तलावात उतरलो आणि मासे पकडले. मात्र पकडलेले हे मासे कुठे विक्री करायचे हे मोठे आव्हान होते. १६ महिलांनी मासे बाजारात विक्री करण्याचा निर्णय घेतल्याचे या महिलांनी सांगितले.

#### महिलांना मिळाला रोजगार

परसूड, सावा दात्या, डेहंगु, उरसुडील, करई, कमळ, शिवनीफुल या वनस्पतीची जुळवाजुळव करुन मुलकी मासे या जीवजंतुसाठी लागवड केली जाते. ही पुरक खाद्ययुक्त वनस्पती तयार करण्याच्या कामी जांभळी येलोडी येथी ममता ठाकरे, अनुसया तुमसरे, सुषमा नंदेश्वर, पार्वता मेश्राम, रुखमा ठाकरे, विठाबाई घरत,सारजा घरत, कमला तुमसरे या महिला काम करत आहेत. त्यांना या माध्यमातून रोजगार मिळाला आहे. पंचक्रोशीत त्यांची जलसंवर्धन गट म्हणून ओळट आहे. त्यांनी केलेल्या वनस्पतीला ८०० ते १२०० रुपये किलोप्रमाणे मोठी मागणी आहे.

#### आयुक्तांनी घेतली दखल

आम्हा १६ महिलुंनी केलेल्या या यशस्वी प्रयोगाची चर्चा सर्वत्र पसरली. नागपूर विभागाच्या तत्कालीन विभागीय आयुक्त प्राजक्त लवंगारे यांना आमची यशोगाथा कळली. त्यांनी निमगाव येथील तलावाचा भेट देऊन आमच्या यशस्वी प्रयोगाची पाहणी केली. मत्स्य जिरे तयार करण्यासाठी दोन टाक्या मंजूर केल्या. आता आम्हाला मत्स्य जिरे तयार करण्यासाठी या टाक्यांची अत्यंत मदत होत आहे.

#### संघर्षाची दशकपुर्ती

मासेमारी हे अत्यंत साहसी काम आहे. या महिला काय करुन घेणार म्हणून लोके टर उडवायचे तर कुणी टोमणे मारायचे. पण घरच्या लोकांची साथ होती.त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळेच ही यशस्वी वाटचाल करता आली. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात तुाव संवर्धन व पुनर्जीवन यावर मागदर्शन करण्यासाठी आम्हाला बोलावले जाते असल्याचे शालू कोल्हे, कविता मौजे व सरिता मेश्राम या महिलांनी सांगितले.



## संपादकीय

### आयकर नोटिसीवरून काँग्रेस-भाजपात कलगीतुरा

काँग्रेस आणि भाजपा यांच्यात लोकसभा निवडणूक जवळ आली असताना जोरदार संघर्ष सुरू झाला आहे. याचे कारण आहे ते म्हणजे प्राप्तिकर विभागाने काँग्रेसला १८२३ कोटी रुपयांची नवी डिमांड नोटीस जारी केली आहे. यामुळे राजकीय वातावरण आणखीच तप्त झाले आहे. २०१७-१८ ते २०२०-२१ या कालावधीपर्यंत ही नोटीस आहे. अगोदरच काँग्रेसची अवस्था संकटमय झाली असताना, या नोटिसीमुळे काँग्रेस आणखीच अडचणीत आली आहे. जी नोटीस दिली आहे, त्यात दंडाव्यतिरिक्त व्याजही सामील आहे. आता आयकर विभागाच्या नोटिसीने काँग्रेसवर आर्थिक संकटाचे ढग दाटले आहेत. काँग्रेसकडे तशी पैशांची टंचाई कधीच नव्हती. राहुल आणि सोनिया गांधी यांच्यावर १७०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी नॅशनल हेराल्ड प्रकरणात खटला दाखल आहे आणि माता-पुत्रांची ही जोडी जामिनावर बाहेर आहे. तरीही काँग्रेस सरकारवर टॅक्स टेररिझमचा आरोप करत आहे. टॅक्स असेसमेंटच्या बाबतीत काँग्रेसची याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस नेते अजय माकन यांनी आरोप केला की, गेल्या सात वर्षांत भाजपाकडे ४६०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. आमच्याकडून १४ लाख रुपयांची वसुली करण्यासाठी आयकर विभागाने काँग्रेसच्या बँक खात्यातून १३५ कोटी रुपये काढून घेतले. काँग्रेस या मुद्द्याला सर्वोच्च न्यायालयापर्यंत नेईल आणि रस्त्यावर उतरूनही संघर्ष करेल, असे माकन यांचे म्हणणे आहे. माकन यांनी भाजपा हा करप्रकरणाच्या माध्यमातून दहशतवादाला खतपाणी घालत आहे, असाही आरोप केला आहे. काँग्रेसकडून आयकर विभागाने नव्याने १८२३ कोटी रुपयांची मागणी केली आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. काँग्रेस आणि भाजपा यांच्यात या मुद्द्यावरून जो कलगीतुरा रंगला आहे, त्याचे मूळ कारण येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुका आहेत. भाजपाचे अनुराग ठाकूर यांनी काँग्रेस ही कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही, असे तिखट उत्तर दिले आहे.

काँग्रेस ही प्रथमपासूनच उद्धट म्हणून ओळखली जाते आणि अजूनही तिचा उद्धटपणा गेला नाही, असे वक्तव्य ठाकूर यांनी केले आहे. पण सत्य हे आहे की, काँग्रेस आयकर विभागाच्या नव्या नोटिसीमुळे बावचळली आहे आणि भाजपा सरकारवर आरोपांची फैरी झाडत आहे. काँग्रेसने कर चुकवला असेल तर काँग्रेसने तो भरून निमूटपणे देशाच्या कायद्याचे पालन करावे. काँग्रेस कायद्यापेक्षा वर नाही आणि सामान्य माणसाला कर चुकवला तर शिक्षा होते. मग करचुकवेगिरीबद्दल नोटीस पाठवल्यामुळे काँग्रेसने इतके आकांडतांडव का करावे, हे अनाकलनीय आहे. काँग्रेस इंडिया आघाडीत असली तरीही आता त्या आघाडीचा बोऱ्या वाजला आहे आणि येत्या लोकसभा निवडणुकीतही काँग्रेसच्या नेतृत्वाखालील ही आघाडी फारसा काही चमत्कार करू शकणार नाही, असे सारेच निवडणूक पूर्वअंदाज सांगतात. त्यामुळे बिथरलेले काँग्रेसचे नेते भाजपावर वाट्टेल ते आरोप करत आहेत. भाजपाने कर दहशतवाद राबवून आणि लोकशाहीचा खून केला आहे, असाही आरोप काँग्रेसचा आहे. पण काँग्रेसला याची आठवण करून द्यावी लागेल की, काँग्रेसने आणीबाणीच्या काळात सर्व विरोधकांना तुरुंगात विनाचौकशी डांबून आणि त्यांचा अतोनात छळ करून लोकशाहीचा कोणता गौरव केला होता, याचे उत्तर त्यांनी द्यावे. काँग्रेस आयकर विभागाच्या नोटिसीमुळे बिथरली आहे आणि त्यामुळे त्या पक्षाचे नेते भाजपावर आरोप करत आहेत. येत्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा सफाया होणार असल्याचे अंदाज सांगत असल्याने काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे. इतकाच या साऱ्या संघर्षनाट्याचा अर्थ आहे. वास्तविक आयकर विभाग हा सरकारचा असला तरीही तो कोणत्याही पक्षाचा नसतो. पण काँग्रेसने भाजपाला जबाबदार धरून लोकशाहीवर हा नृशंस हल्ला आहे, अशी टीका केली आहे.

काँग्रेसने वाटेल तसा कर चुकवावा आणि त्या पक्षाकडून आयकर विभागाने वसुलीही करू नये, अशी काँग्रेसची अपेक्षा दिसते. लोकशाही देशात हे चालत नाही. पण काँग्रेस अजूनही सरंजामदारी मानसिकतेत असल्याने आणि तिला आपण विरोधी पक्षात आहोत, हे अजूनही पचनी पडलेले नाही. त्यातूनच हे आरोप होत आहेत. ग्रँड ओल्ड पार्टीचे हे नेहमीचेच आहे आणि त्यामुळे काँग्रेसच्या या त्राग्याकडे जनतेने लक्ष दिलेले नाही. निवडून आल्यावर आम्ही बघून घेऊ, अशी धमकी राहुल गांधी यानी दिल्याचे प्रसिद्ध झाले आहे. राहुल यांची ही धमकी पोकळच आहे कारण त्यांचा पक्ष निवडून येण्याची शक्यता फारच कमी आहे. खुद्द राहुल यांना सुरक्षित मतदारसंघ अजून सापडलेला नाही. वायनाडमधून लढायचे की नाही, याबद्दल अजून पक्षाचा निर्णय झालेला नाही. त्यामुळे राहुल यांनी अशी धमकी दिली असली तरीही ती भाजपाने फारशी मनावर घेतलेली नाही. ग्रँड ओल्ड पार्टीने सरकारवर आरोप केला की, भाजपाचे सरकार आम्हाला आर्थिकदृष्ट्या खच्ची करण्याचा प्रयत्न करत आहे. पण इतके आरोप-प्रत्यारोप सरकारवर करण्यापेक्षा काँग्रेस कर भरून मोकळी का होत नाही, हा जनतेच्या मनातील सवाल आहे. सामान्य नागरिकाला जो न्याय तोच न्याय ग्रँड ओल्ड पार्टीला लावला पाहिजे. कोणतेही सरकार असा भेदभाव करू शकत नाही. त्यामुळे काँग्रेसने कर भरावा हे उत्तम आहे. हा पैसा काही पंतप्रधान मोदी यांच्या घरात जाणार नाही. तो सरकारी तिजोरीत जमा होणार आहे. तरीही काँग्रेसने कर भरण्यास इतकी खळखळ का करावी, हा प्रश्न आहे.

## नातेवाईक असलेल्या भाजप उमेदवाराच्या विजयासाठी पटोलेंनी दिला डमी उमेदवार

**गोंदिया :** भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकरीता उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर १८ उमेदवार रिंगणात राहिले आहेत.यामध्ये काँग्रेसचे माजी आमदार सेवक वाघाये यांच्याही त्यात समावेश असून त्यांनी अपक्ष म्हणून दंड थोपटले आहे.माजी आमदार वाघाये यांच्यानुसार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यवसायिक रुप घेऊन तिकिटाचे वितरण केले. काँगेसने दिलेला उमेदवार हा डमी असून विधानसभा निवडणुकीत तो २००० मताच्यावर आकडा पार करु शकला नाही. त्यातच भाजपचे उमेदवार व विद्यमान खासदार सुनिल मेंढे हे पटोलेंचे नातेवाईक असून आपल्या नातेवाईकाच्या विजयाकरीताच डमी उमेदवार दिल्याचा आरोप वाघायेंनी केला आहे.




भाजपचा नातेसंबंधातील उमेदवार असलेल्या भंडारा-गोंदिया मतदारसंघात नाना पटोलेंनी डमी उमेदवार दिल्याचा आरोप माजी आमदार सेवक वाघाये यांनी केला आहे. याद्वारे त्यांनी आपल्या आमदारकीची डील केल्याचाही आरोप वाघाये यांनी केला आहे. महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार सुनील मेंढे हे पटोलेंचे नातेवाईक आहेत. त्यांना निवडून आणण्यासाठी पटोले यांनी डमी उमेदवार दिला आहे. २०१४ मध्ये शिवसेनेकडून निवडणूक लढलेल्या डॉ. प्रशांत पडोळे यांना २००० मते पडली होती. त्याला काँग्रेसने उमेदवारी दिली आहे. त्याने कधी पंजा हातात घेतला नाही, कधी काँग्रेसचा प्रचार केला नाही की झेंडा हातात घेतला नाही. सुधाकर गणगणेंना पाडल्यामुळे विलासराव देशमुखांनी नाना पटोले यांना पक्षातून काढले होते. १० वर्षांनी ते परत काँग्रेसमध्ये आले आणि राहुल गांधी, सोनिया गांधींना फारशी माहिती नसल्याने त्याचा गैरफायदा ते घेत आहेत. आम्ही पक्ष उभा केला, नानांमुळे पक्ष संपायला लागला आहे, असा आरोप वाघाये यांनी करीत आपण काँग्रेसची अस्मिता वाचविण्याकरीता रिंगणात असल्याचे म्हटले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# आपल्या हातून एक पिढी घडणार आहे याची नेहमी जाण ठेवा-एम.मुरुगानंथम

## नवनियुक्त शिक्षण सेवकांची उद्बोधन कार्यशाळा उत्साहात संपन्न




**गोंदिया :** शासनाच्या पवित्र पोर्टल द्वारे नवनियुक्ती मिळालेल्या गोंदिया जिल्ह्यातील शिक्षण सेवकांची एक दिवसीय कार्यशाळा स्थानिय पी.पी.अध्यापक विद्यालयात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. त्या कार्यशाळेत नियुक्ती मिळालेल्या तीनशे शिक्षकांना मार्गदर्शन करतेवेळी एम. मुरुगानंथम यांनी सदर उदगार काढले व शिक्षकांनी नेहमी नवनवीन ज्ञान, तंत्र व कौशल्य आत्मसात करून नवीन पिढी घडवावी असे आवाहन केले.

सदर कार्यशाळेचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गोंदिया व जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग गोंदियाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रस्ताविकासह निपुण भारत या विषयावर डायटच्या अधिव्याख्याता पूनम घुले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरण (N>EP) २०२०, अडएठ, PGI, N>AS>, S>L>AS, अध्ययन स्तर निश्चिती इत्यादी विषयावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. अधिव्याख्याता डॉ. भाऊराव राठोड यांनी ICT>, DIKS>H$A A±n, S>WAYAM पोर्टल, इत्यादी तंत्रज्ञानाचा अध्यापनात प्रभावी वापर, व्यक्तिमत्व विकास इत्यादी बाबीवर सविस्तर प्रकाश पाडला. अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत भाषा विषयाचे मार्गदर्शन साधनव्यक्ती उर्मिला वैद्य यांनी तर गणित विषयाचे मार्गदर्शन माध्यमिक शिक्षक सुभाष मारवाडे यांनी केले.

दुपारच्या सत्रात समग्र शिक्षा चे सहायक कार्यक्रम अधिकारी दिलीप बघेले यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (R>T>E) २००९ व समग्र शिक्षा च्या विविध योजना यावर सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यापक विद्यालयाचे अध्यापकाचार्य दिलीप पडोळे यांनी २१व्या शतकातील कौशल्ये, मिनाक्षी कटरे यांनी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेला उपस्थित शिक्षणाधिकारी(प्राथ.) सुधीर महामुनी यांनी सेवा पुस्तिका भरतांना घ्यावयाची काळजी व विविध प्रशासकीय, तांत्रिक बाबी कशा हाताळाव्या यावर सूक्ष्म असे मार्गदर्शन केले.

त्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी कार्यशाळेला भेट देऊन अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात या नवनियुक्त शिक्षण सेवकांना विशेष असे मार्गदर्शन केले. कर्तव्यावर रुजू होताना आपले स्वतःचे अनुभव कथन करून सर्वांनी पुढील ध्येय साध्य करण्यासाठी, गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडविण्यासाठी सदैव तत्पर रहा, नवनवीन तांत्रिक कौशल्य आत्मसात करून आपल्या अध्यापनात त्याचा वापर करा असे सुचनावजा आवाहन केले.

कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उपशिक्षणाधिकारी अशोक लांडे, साधनव्यक्ती वशिष्ठ खोब्रागडे, सुनील ठाकूर, प्रदीप शरणागत, देविदास हरडे, अंकला माने, शिक्षक सुनिल हरिनखेडे, तंत्रस्नेही शिक्षक दिनेश उके यांनी विशेष सहकार्य केले. कार्यशाळेच्या सुंदर आयोजनासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डायटचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य व टीम चे कौतुक केले.

सेल्फीसाठी उमडली झुम्मड: गोंदिया जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून एम. मुरुगानंथम यांचीही पहिली पोस्टिंग असून पहिल्याच महिन्यात या नवनियुक्त शिक्षकांना पदस्थापना देताना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली व प्रत्येक शिक्षकाला दुर्गम भागातील शाळांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करून दिली, व प्रत्येकाशी अत्यंत आपुलकीने व प्रेमाने वागणूक दिल्याने सर्व शिक्षक भारावून गेले असल्याचे दिसून आले. 'अधिकारी असावा तर असा' असे प्रत्येक शिक्षक म्हणत होता व आपल्या या प्रेमळ अधिकारी सोबत एक फोटो (सेल्फी) काढण्यासाठी सर्वांनी एकच झुम्मड करून सेल्फी काढून घेतली. शिक्षकांच्या या उत्साहाला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही छान प्रतिसाद दिला.

## हत्तीरोग सामुदायिक औषधोपचार मोहिमेची पाहणी करीता जिल्हा आरोग्य अधिकारी पोहचले गावात



**गोंदिया :** जिल्ह्यातुन हत्तीपाय रोगाबाबतची विकृती कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत दि.२६ मार्च ते ५ एप्रिल दरम्यान हत्तीरोग दुरीकरणासाठी सामुदायिक औषधोपचार मोहिम गोंदिया, तिरोडा, गोरेगाव व अर्जुनी मोरगाव या चारही तालुक्यात राबवली जात आहे. मोहिमे दरम्यान भावी पिढिला हत्तीरोगापासुन मुक्ती मिळण्यासाठी आरोग्य विभाग अहोरात्र कामकाज करत असुन दिवस रात्र एक करुन लोकांना प्रत्यक्ष निशुल्क गोळ्या खावु घालण्यात व्यस्त आहे. दिवसा गृहभेटी दरम्यान आरोग्य कर्मचारी लोकांना गोळ्या खावु घालण्यासाठी जात आहे परंतु लाभार्थी हे रोजगार हमी योजना किंवा आपल्या कामा निमित्त घराबाहेर असल्याने रात्री पुन्हा गृहभेट करुन लोकांना गोळ्या खावु घालत आहे.

दि. ३० मार्च रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी गोंदिया तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र एकोडी व भानपुर ला आकस्मिक भेटी देवुन हत्तीरोग दुरीकरणासाठी सामुदायिक औषधोपचार मोहिमेच्या होत असलेल्या कामकाजाची पाहणी केली.त्यावेळी दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ.नंदिनी गणवीर, डॉ.सिमा वलके, डॉ.तुलसी भगत, डॉ.शुभम बिसेन, डॉ.स्मिता दिक्षित यांचे सह सर्व स्टॅाप व ईतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी डॉ.वानखेडे यांनी हत्तीरोग दुरीकरणासाठी सामुदायिक औषधोपचार मोहिम सुक्ष्मकृती आराखडा नुसार प्रभावीपणे राबविणे, कार्यक्षेत्रातील गावांमध्ये शाळा, कॉलेज, महाविद्यालय, बँक, सोसायटी, अंगणवाडी, शासकिय कार्यालय, आश्रमशाळा, आरोग्य संस्थेत ई.ठिकाणी बुथाचे आयोजन करण्यात यावे, गृहभेटीच्या माध्यमातुन आरोग्य कर्मचारी यांनी लाभार्थ्यांना वयोमानानुसार डि.ई.सी.व अल्बेंडाझॉल गोळ्यांची मात्रा प्रत्यक्ष खावु घालण्यात यावे. आरोग्य पर्यवेक्षक यांचे मार्फत दैनंदिन पर्यवेक्षण करण्यात यावे, एमडीए कार्यक्रमाची जनजागृती चांगल्या प्रकारे करण्यात यावी, जिल्ह्यात उष्णतेचे वाढते प्रमाण बघता कोल्ड रुम कार्यान्वीत करावीत, औषधी उपलब्ध ठेवावी, जैविक घनकचराची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी, आरोग्य संस्थेत स्वच्छता ठेवावी, गृहभेटि दरम्यान आरोग्य कर्मचारी यांचे माफर्फत लोकांमध्ये मतदान जनजागृती कर्ण्यात यावी अशा विविध बाबी अंमलबजावणी करण्याच्या सुचना यावेळी करण्यात आल्या.

यानंतर डॉ.वानखेडे यांनी गावांमधील काही निवडक घरांना भेटी देवुन कुटुंबातील सदस्यांची हितगुज संवाद साधुन प्रत्यक्ष गोळ्या खाण्यात येतात कि नाही याची पडताळणी केली.तसेच त्या नंतर होणाऱ्या त्रासाबाबत चर्चा केली, बोटाला लावण्यात येणारी मार्किंगची शहानिशी केली.

आपल्या भावी पिढिला हत्तीपाय या आजारापासुन वाचविण्यासाठी सर्व पात्र लोकांनी गोळ्यांचे सेवन करण्यात यावे. गोळ्या या सुरक्षित असून लोकांनी कुठलाही गैरसमज किंवा संकोच न बाळगता लोकांनी गोळ्या खाण्याचे आवाहन डॉ.वानखेडे यांनी याप्रसंगी लोकांना केले आहे. भेटी दरम्यान त्यांचे सोबत जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल व जिल्हा आयईसी अधिकारी प्रशांत खरात उपस्थित होते.

## आचारसंहितेत शेतकर्यांच्या खात्यावर बोनसची रक्कम जमा



**गोंदिया :** अडचणीत सापडलेल्या राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांसह राजकीय पक्ष, विविध संघटनांनी शासनाकडे केली होती. या अनुषंगाने नागपूर येथील विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार बोनसकरीता लागणारा निधी २८ मार्च रोजी सुधारीत पत्र शासनाने जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडे उपलब्ध करुन दिल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.१ एप्रिलला सुमारे २६ हजार शेतकऱ्याच्या खाात्यावर ५६ कोटी रुपये बोनसची रक्कम जमा झाली आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असताना ही रक्कम जमा झाल्याने आचारसंहितेचा भंग नाही का अशा प्रश्नही विचारला जाऊ लागला आहे.

२०१८ च्या लोकसभा पोटनिवडणुकीच्या वेळी तत्कालीन भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे जिल्हा निवडणुक अधिकारी व गोंदियाचे जिल्हाधिकारी अभिमन्यू काळे यांनी मावा व तुळतुळा नुकसान भरपाईकरीता आलेला निधी हा २५ व २६ मे २०१८ रोजी रात्रीला बँका सुरु करुन शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश दिले होते. त्यावेळी पोटनिवडणुकीची आचारसंहिता असल्याने ती रक्कम देणे म्हणजे मतदार असलेल्या शेतकर्यांना आमिष असल्याची तक्रारी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने मुख्य निवडणुक अधिकारी यांच्याकडे करण्यात आली होती. त्या प्रकरणात काळे हे आचारसंहिता भंग करण्यात प्राथमिक दोषी आढळल्याने त्यांची तत्काळ बदली करण्यात आली होती. त्यावेळी राज्यात भाजपसेनेची सरकार होती. आत्ताही भाजप-सेना व राष्ट्रवादीची सरकार असल्यामुळेच यावेळी राष्ट्रवादीचे नेत्यांना आचारसंहिता भंग झाल्याचे वाटत नाही असा सुरु मतदारासंह नागरिकात येऊ लागला असून राष्ट्रवादीची भूमिका ही सत्तेनुरुप बदलत असल्याचे बोलले जात आहे.

२४ फेब्रुवारी रोजी शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने धान उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनस देण्याचा शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यानुसार धान खरेदीच्या पोर्टलवर नोंदणीकृत जिल्ह्यातील १ लाख २५ हजार १२५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट रक्कम जमा केली जाणार आहे. याकरीता मार्केटिंग फेडरेशनला २३९ कोटी ३३ लाख ५६ हजार रुपयाचा निधी उपलब्ध झालेला आहे. गोंदिया जिल्ह्यात या हंगामात ८० हजार ७७७ शेतकऱ्यानी २४ लाख ७६ हजार ६२५ क्विंटल धानाची विक्री केली आहे. जी मागील वर्षीच्या तुलनेत १५ लाख क्विंटलने खरेदी कमी आहे. भंडारा जिल्ह्याकरीता ३०० कोटी ५१ लाख १८ हजार ३६० रुपये, गडचिरोली जिल्ह्याकरीता ८५ कोटी ३५ लाख ४७ हजार ७८० रुपये, चंद्रपूर जिल्ह्याकरीता १५६ कोटी ४४ लाख,५० हजार ६४० रुपये, तर नागपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकरी करीता ७५ कोटी ७ लाख ९५ हजार ६६० रुपयाचा बोनस निधी उपल्बध करुन देण्यात आल्याचे पत्र दि.महाराष्ट्र स्टेट को ऑफरेटीव मार्केटिंग फेडरेशनच्यावतीने २८ मार्च २०२४ रोजी सुधारीत पत्र काढून वितरीत करण्यात आले आहे.

जिल्ह्यासह पूर्व विदर्भ, कोकणात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पन्न घेतले जाते. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत योजनेअंतर्गत राज्यात महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह फेडरेशनच्या माध्यमातून गोंदियात जिल्हा पणन अधिकारी कार्यालय आणि आदिवासी विकास महामंडळाच्या उपअभिकर्ता संस्थांमार्फत शेतकऱ्यांकडून धान खरेदी केले जाते. यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्र शासनाने साधारण धानाला २०४० रुपये व "अ' श्रेणी धानाला २०६० रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला होता.

## वनविभागात "रेड अलर्ट", जंगल परिसरात लागला वणवा!

**देवरी :** वनविभागाच्या अखत्यारितील जंगलात तापमानात वाढ होताच आगीच्या घटनांना सुरुवात झाली आहे. उपाययोजना म्हणून जंगलातील जाळरेषा जाळण्याचे काम संपले असून, आता आगीपासून जंगलाचे संरक्षण करण्यासाठी वनाधिकारी ते क्षेत्रीय कर्मचाऱ्यांपर्यंत "अलर्ट' राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. १५ जूनपर्यंत "रेड अलर्ट' असून जंगलात आग विझवण्यासोबतच नागरिकांच्या सहकार्याने आग लागूच नये, अशी खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधितांना करण्यात आल्या आहेत. मात्र देवरी तालुक्यातील आमगाव देवरी महामार्गालगत जंगल परिसरात जोरदार वणवा लागला असल्याचे चित्र बघावयास मिळाले. यावरुन वनविभागाच्या "रेड अलर्ट' ही संकल्पना चर्चेचा विषय ठरली आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगल असून वन्यप्राण्यांचे अधिवास आहे. मात्र उन्हाळ्याच्या दिवसात नैसर्गिक व मानवनिर्मित आग लावल्याने हजारो हेक्टर जंगलाची दरवर्षी राखरांगोळी होते. यात सरपटणाऱ्या प्राण्यांपासून जंगली प्राण्यांचा होरपळून मृत्यू होतो. कोट्यवधी रुपयांची वनसंपदा नष्ट होत असताना पर्यावरणाचे सर्वाधिक प्रमाणात नुकसान होते. जंगलात लागणाऱ्या आगी मानवनिर्मित व नैसर्गिक असतात. आतापर्यंतच्या पाहणीत आगी मानवनिर्मितच असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्या आगी रोखण्यासाठी क्षेत्रीय वनकर्मचारी व वनाधिकारी यांनी गावागावांत बैठका घेऊन जनजागृती करुन वनव्यवस्थापन



### सॅटेलाईटहून आगीची माहिती

**वनकर्मचाऱ्यांना जंगलात आग लागल्याची माहिती ठेवण्यासोबतच ती कुठे लागली ही नोंद ठेवणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर संबंधित उपवनसंरक्षक व वरिष्ठ अधिकाऱ्यांना सर्वे ऑफ इंडियाकडून सॅटेलाईटद्वारे माहिती पाठविली जाते. परंतु काही वर्षात काही भागात जंगलात आग लागण्याचे प्रमाणे वाढल्याचे दिसत आहे, ते थांबविण्यासाठी निसर्गप्रेमींनी पुढे येणे गरजेचे आहे.**

समित्या व गावातील नागरिकांचे सहकार्य घेण्याच्या सूचना वनविभागाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. वन वणवा हंगामातंर्गत जाळरेषा कापणे व जाळणे ही आगीपासून संरक्षण मिळवणारी कामे प्रत्येक वनक्षेत्रातील वनखंड ते जिल्हा व आंतरराज्य महामार्गावरील जंगलातील सीमारेषेवर करण्यात आली. प्रत्येक वनखंडात ६ मीटर, आंतरराज्य व जिल्हा सीमारेषेवर १२ मीटरपर्यंत जाळरेषा जाळण्यात आल्या. लागलेली आग पुढे पसरु नये, यासाठी अखंड गवताच्या परिसरात रस्त्याच्या आकाराचा काडीकचरा जाळण्यात येतो, त्याला जाळरेषा म्हणतात. हे काम संपल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# एकच साहेब बाबासाहेब म्हणजे नेमके काय रे भाऊ?

१४ एप्रिल हा डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा दिवस जवळ आला की, लोकांच्या तोंडी हे वाक्य हमखास दिसते. एवढेच नाहीतर जयंतीदिनी लागणाऱ्या बॅनर, पोस्टर यावरही ठळक अक्षरात हे वाक्य छापले जाते. पण हे वाक्य कोठून व कसे आले हे आजपर्यंत भल्याभल्यांना समजलेले नाही. कारण हे वाक्य सुरवातीपासून आंबेडकरी चळवळीचे घोषवाक्य होते असे मुळीच नाही व तसे चळवळीच्या इतिहासाच्या पानावर ही कोठे वाचायला आजपर्यंत मिळाले नाही. तरीपण आज या वाक्याची मोठी चलती व मोठा बोलबाला आहे. हे आजतरी सर्वांनाच मान्य करावे लागते. याचे नेमके कारण काय व याचा गर्भित अर्थ आणि नेमका संदेश काय? हा साधा प्रश्न मला एका व्याख्यानात व्याख्यान झाल्यावर एकांतात एका चाणाक्ष आंबेडकरी कार्यकर्त्यानेच विचारला. यावर बरेच चिंतन केल्यानंतर आज मोबाईलवर माझे बोटे वळवळायला लागली.

खरेतर हे वाक्यच भारतीय दलित पँथरच्या फुटीथघनंतर व तिच्यातून सटरफटर नेते तयार झाल्यानंतर जन्माला आले. कारण या अगोदर समाजाने डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणा नतंर आंबेडकरी चळवळ फुटून गटा गटात तिचे विभाजन झालेले पाहिले होते. पण ते सर्व गट निदान त्यावेळी फक्त हाताच्या बोढदगटावर तरी मोजता येत होते. यामुळे समाज व चळवळ फूटली याचे फारसे दुःख समाजाला वाटत नव्हते. पण याचे दुःख मात्र समाजाच्या उराशी होते. पण त्यावेळी समाजाने आंबेडकरी नेत्यांना ऐक्याचा इशारा देण्यात इतपत सुज्ञ नव्हती म्हणण्यापेक्षा हे कधीतरी एक होतील या आशेवर जनता जगत होती. पण पँथरच्या फूटीनतंर आंबेडकरी गटांचे इतके पेव फुटले की, निर्माण होणारे गट समाजाला स्वतःच्या हाता पायांच्या बेटावरही मोजता येईना व ती बोटेही अपूरी पडू लागली. यामुळे समाजाचा धीर खचला व आता काही खरे नाही असा विचार करून आंबेडकरी समाज आपली सारी भिस्त डॉ आंबेडकरांच्या चरणी वाहून आपले जीवन जगण्यासाठी सिद्ध झाला.




तरीही समाजाने आमरण उपोषण करून या सर्वच गटांना एकत्रित आणले. पण या ऐक्याचे एक विशेष म्हणजे या विचार पीठावर सर्वच नेत्यांनी ऐक्याच्या समाजा समोर आणाभाका घेतल्या व समाजात आनंदाची लहर सोडली. पण या आणाभाका काही दिवसातच वाऱ्यावर विकल्या व समाज परत पोरका झाला. या सर्वच नेत्यांनी समाजाचा घोर अपमान केला. पण या अपमानाचे विशेष म्हणजे यातील पँथर गटाच्या नेत्यांनी एक होवून त्याचे खापर आंबेडकरी घराण्याच्या व भारिप बहुजन महासंघाच्या प्रकाश आंबेडकरांवर फोडले व स्वतः नामानिराळे राहिले. याचे कारण म्हणजे आंबेडकरी घराण्याचा वारसदार असणारे प्रकाश आंबेडकर यांना व त्यांच्या भारिप बहुजन महासंघाला बदाम केल्याशिवाय आपल्या गटांना राजकीय सामाजिक मान्यता मिळणार नाही व आपापली राजकीय दुकाने चालणार नाही, यावर त्यांचे एकमत होतेच, हे काही लपून राहिले नाही.

सर्वच पँथर गटांनी एक होवून प्रकाश आंबेडकरां विरोधात टीकेचे रान उठवल्या नतंर समाजाचा होता नव्हता तोही धीर खचला व आंबेडकरी समाज स्वतःला पोरका समजू लागला आणि यातूनच एकच साहेब बाबासाहेब या वाक्याचा जन्म झाला. खरे तर समाजाला या पँथरच्या गटांना हे दाखवून द्यायचे होते की, जर आमच्या उद्धार विकासासाठी आम्ही नेत्यांना व नेत्यांच्या गटाला झूगारले आसून, आम्ही आता आमच्या बापाच्या विचाराने चालणार आहोत व आता आम्हाला वाली आणि दबकैवारीही तेवढाच राहिलेला आहे. आणि या मानसिकतेतून जनतेने आंबेडकरी नेत्यांना वठणीवर आणण्यासाठी एकच साहेब बाबासाहेब हा सामुहिक नारा दिला व तो आज जनतेचा आंतरिक आवाज ठरला आहे.

पण जनतेची हि सामुहीक एकमुखी भावना कोणत्याच नेत्याच्या लक्षात आली नाही. उलट रिडल्सच्या प्रकरणावर व भोतमांगे हत्याकांडाच्या वेळी स्वतःहून रस्त्यावर उतरलेल्या जनतेचाही या पँथरच्या गट नेत्यांनी आपला राजकीय फायदा करून घ्यायचे ठरवले व आम्हीच जनतेला रस्त्यावर उतरायला सांगितले असे निर्लज्जपणे बोलण्याचे धाडस करू लागले. पण यातून धडा घेतला तो फक्त आंबेडकरी घराण्याच्याच प्रकाश आंबेडकरांनी. त्यांनी आता समाजाला कोणी वाली राहिला नाही हे ओळखून मनूवाद्यांनी भीमा कोरेगाव दंगल घडवली व आंबेडकरी समाजाला भारतीय समाजवेवस्थेत टार्गेट केले, हे पाहून त्यांनी परत डॉ बाबासाहेब आंबेडकरां प्रमाणे समाजासाठी रणमैदानात उतरून महाराष्ट्र बंदची भीमगर्जना केली व समाजानेही प्रकाश आंबेडकरांच्या भीमगर्जनेला साद देवून महाराष्ट्र बंद यशस्वी करून दाखवला. पून्हा समाजाच्या कामी बापाचेच घराणे धावले व समाजाला बापाच्याच वंशाचा नेता मिळाला. यातूनच वंचित बहुजन आघाडीचा जन्म झाला व आंबेडकरी समाजा बरोबरच इतर आदिवासी, ओबीसी व मुस्लिम समाज याच आंबेडकरी घराण्याच्या व आंबेडकरी वंशाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून एका झेंड्याखाली एकवटला. यामुळे आज वंचितची ताकद वाढली व

एकच साहेब बाबासाहेब या मार्गाने गेल्यावर कोणते सामाजिक फायदे होतात हे समाजालाच सर्वात जास्त मोठ्या प्रमाणात समजून आले. एवढी ताकद व जोष या वाक्यात आहे.

**दिपक गायकवाड**

# ना नवेगावबांध पर्यटन संकुलाचा विकास,ना मिळाला हाताला रोजगार



## पर्यटकांचा होतोय हिरमोड: लोकप्रतिनिधीच्या केवळ पोकळ घोषणा

**नवेगावबांध:** केंद्र व राज्य शासनाच्या वतीने पर्यटनातून रोजगार निर्मिती हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कोट्यावधी रुपयांच्या अनेक योजना राबविल्या जात आहे. मात्र या योजनांपासून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीयस्तरावर प्रसिद्ध असलेल्या नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानातील हे उपेक्षित पर्यटन स्थळ कोसो दूर आहे. मागील दहा वर्षात ना यातून रोजगार निर्मिती झाली तर लोकप्रतिनिधींनी दिलेले आश्वासनसुद्धा फोल ठरले आहे.

वन विभागाच्या वतीने १५ ऑगस्ट २०१६ रोजी संयुक्त वन व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली होती. समितीने १०० युवक-युवतींना पर्यटन संबंधित प्रशिक्षणही दिले आहे. मात्र हे प्रशिक्षीत युवक-युवती अद्यापही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. समितीकडे कोट्यावधी रुपयांचा निधी अखर्चित पडून आहे. पर्यटन संकुलाच्या विकासासाठी पाच वर्षापुर्वी सात कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून अद्याप कुठल्याही कामाला सुरुवात झाली नाही. मागील दोन

### यांचाही रखडला विकास

**या पर्यटन संकुलात विश्रामगृह, बालोद्यान, उपहारगृह, संजय कुटी परिसर, हिल टॉप गार्डन, हॉलिडे होम, पुनरुज्जीवनाच्या प्रतीक्षेत असलेले व अद्यापही लोकार्पण न झालेले एक गार्डन, सभागृह, मनोहर उद्यान, तंबू निवास, नोकायनन हे अद्यापही विकासाच्या प्रतीक्षेत आहेत.**

### ७ कोटी निधी मंजूर पण खर्च करण्यास कुचराई

**रोजगार व पर्यटन विकासासाठी पर्यटन संकूल वन व्यवस्थापन समितीच्या ताब्यात देण्यात यावे. ७ कोटी रुपयानच्या मंजूर निधीतून विकास कामे करण्यात यावी, पर्यटन संकुलाच्या विकास आराखड्यानुसार विकास व्हावा अशी मागणी संयुक्त वन व्यवस्थापन समितीने शासन आणि प्रशासनाकडे वारंवार केली. पण त्याची अद्यापही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे नवेगावबांध पर्यटन संकुलाचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.**

### पर्यटनावरही होतोज परिणाम

**नवेगावबांध येथे जलाशय तसेच लागूनच नवेगावबांध-नागझिरा व्याघ प्रकल्प आहे. त्यामुळे या परिसरात सातत्याने पर्यटकांची वर्दळ असते. व्याघ्र प्रकल्पाला भेट देणारे पर्यटक नवेगावबांध येथील पर्यटक संकुलाला भेट देण्यासाठी येतात पर तिथे सोयी सुविधांचा अभाव असल्याने पर्यटकांचा सुद्धा हिरमोळ होत असून पर्यटनावर सुद्धा परिणाम होत आहे.**

### १०० प्रशिक्षीत युवक-युवतींना रोजगाराची प्रतीक्षा

**संयुक्त वन व्यवस्थापन समितीने १०० युवक-युवतींना पर्यटन संबंधित प्रशिक्षणही दिले आहे. मात्र हे प्रशिक्षीत युवक-युवती अद्यापही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. मागील सात वर्षापासून त्यांना रोजगाराची प्रतीक्षा कायम आहे.**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत लोकप्रतिनिधींनी नवेगावबांध पर्यटन संकुलाचा विकास करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले होते. पण प्रत्यक्षात मात्र कुठलीच कृती न केल्याने ना नवेगावबांध पर्यटन संकुलाचा विकासचा झाला ना हाताला रोजगार मिळाला असे चित्र आहे.

# शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच जमीन अधिग्रहण करा

## उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



**तिरोडा (गोंदिया) :** नागपूर ते गोंदिया द्रूतगती (समृद्धी) मार्ग बांधकामाचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या संदर्भात काही दिवसांपूर्वी अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली. गोंदिया जिल्ह्यातून द्रुतगती मार्ग जाणार आहे. तालुक्यातील ज्या गावातून हा महामार्ग जाणार तेथील शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे. या महामार्गाच्या बांधकाम करताना शेतकऱ्यांसोबत अन्याय होऊ नये, शेतकऱ्यांना विश्वासात घेवूनच महामार्गाचे काम व्हावे, याकरीता धादरी-उमरी येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देवून आपल्या समस्या व मागण्या शासनासमोर ठेवल्या आहेत.

गोंदिया व नागपूर या दोन शहरांना जोडणाऱ्या द्रुतगती महामार्गाचे बांधकाम करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला. या निर्णयाला राज्यपालांकडून शिक्का मोर्तब झाला असून त्यांच्या आदेशान्वये अधिसुचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. हा मार्ग तिरोडा तालुक्यातून गोंदियाला जोडला जाणार आहे. या मार्गासाठी तिरोडा तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहण करण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. या बाबीला घेऊन धदरी, उमरी येथील शेतकऱ्यांनी आगामी जमीन अधिग्रहणाला घेऊन उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच महामार्गाचे काम व्हावे, प्रत्येक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे, कुटूंबातील एका सदस्याला योग्यतेनुसार शासकीय नोकरीत समावेश करावा, गोंदिया-नागपूर समृध्दी महामार्ग लगत शेतकरी व गावकऱ्यांच्या उपयोगाकरीता दुतर्फा सर्विस रस्ता तयार करावा, जमिन अधिग्रहण करताना आजच्या नविन खरेदी खताच्या पाच पट रक्कम द्यावी, जे शेतकरी भुमिहीन होणार त्यांना शासकीय जमीन उपलब्ध करून द्यावी, आदि मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी व तिरोडाचे आमदार विजय रहांगडाले यांना पाठविण्यात आली आहे.

निवेदन देताना कुमूद पटले, हिमालय पटले, मंसाराम पटले, विजय पटले, निलेश पटले, मोरेश्वर अनकर, बकीराम नागपुरे, प्रभुलाल कुराहे, प्रकाश नागपुरे, महेंद्र दमाहे, अनिल मानकर, सुकराम पटले, रविकुमार बिरनवार, भाऊदास अनकर, शंकर कुराहे, विरेंद्र पटले, मनोहर पटले, अनिल अंबुले, भुमेश्वरी पटले, लक्ष्मीकांत पटले आदिंसह उमरी, धादरी येथील शेतकऱ्यांची उपस्थित होती.

# कत्तलखान्यात नेणाऱ्या २१ जनावरांची रावणवाडी पोलिसांनी केली सुटका

**गोंदिया :** कत्तलखान्यात नेण्यासाठी कोंबून ठेवलेल्या जनावरांचे वाहन पोलिसांनी पकडले असून त्यातील २१ जनावरांची सुटका करण्यात आली. रावणवाडी पोलिसांनी ग्राम चंगेरा येथे रात्री ८ वाजेदरम्यान ही कारवाई केली.

जनावरांना कत्तलीकरिता घेऊन जाण्यासाठी वाहन क्रमांक एमएच ३७-टी ३११४ मध्ये २१ जनावरांना चारापाणी न देता त्यांचे पाय बांधून दाटीवाटीने वाहनात डांबून नेण्याच्या तयारीत असताना पोलिस शिपाई नरेंद्र मेश्राम व त्यांच्या सहकाऱ्यांनी धाड घालून वाहन पकडले. वाहनात बघितले असता त्यात २१ जनावरे कोंबून असल्याचे दिसून आले. या प्रकरणात पोलिसांनी १२ लाख रुपये किमतीचे वाहन, तर दोन लाख १० हजार रुपये किमतीची जनावरे असा एकूण १४ लाख १० हजार रुपयांचा माल जप्त केला. तसेच, आरोपी फिरोज खान रशीद खान (५२, रा. सेलूबाजार, जि. वाशिम), राजीक सफी कनोज (२७, रा. बाजारटोला-काटी) व जितेंद्र हरिलाल अंबुले (२९, रा. बाजारटोला-काटी) या तिघांवर २९ मार्च रोजी रावणवाडी पोलिसांनी प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा कायदा कलम ११, १, (ड) सहकलम ५ अ, ९ अ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाचे कलम १०९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलिस हवालदार बघेले करीत आहेत. या प्रकरणातील आरोपींनी बाजारटोला येथील रविशंकर तोफसिंग तुरकर (२८) व थानसिंग तोफसिंग तुरकर (२३) या दोघा भावंडांना पोलिसांचा खबऱ्या असल्याचा संशय घेत २८ मार्च रोजी रात्री १० वाजता बाजारटोला येथे शिवीगाळ करीत काठी व दगडाने मारून जखमी केले.

# धिरेंद्र शास्त्री यांना त्वरित अटक करा



**तिरोडा:** भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुयात बाबा बागेश्वर उर्फ धिरेंद्र शास्त्री यंनी प्रवचना दरम्यान परमात्मा एक सेवक धर्माबद्दल अपशब्द वापरल्याचा आरोप आहे. यामुळे नागपुर,भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात धिरेंद्र शास्त्री यांच्या विरोधात परमात्मा एक सेवकाच्या कार्यकर्त्यांचा आक्रोश निर्माण झाला आहे. तिरोडा तालुक्यातील परमात्मा एक सेवकचे कार्यकर्ते रविवारी सकाळी तिरोडा येथील जुनी नगर परिषद मैदानासमोर एकत्रित आले. त्यांनी बाबा बागेश्वर उर्फ धिरेंद्र शास्त्री यांच्या विरोधात नारे दिले. यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन गाठून पोलीस निरीक्षक देविदास कठाळे यांना निवेदन देऊन धिरेंद्र शास्त्री यांना अटक करण्याची मागणी केली.

बाबा बागेश्वर उर्फ धिरेंद्र शास्त्री यांनी परमात्मा एक सेवक धर्माबद्दल अपशब्ध वापरल्याने संपूर्ण परमात्मा एक सेवकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. धिरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली. दरम्यान यामुळे रविवार (दि.३१) सकाळी तिरोडा येथे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यानंतर परमात्मा एक सेवकांनी तिरोडा पोलीस गाठून धिरेंद्र शास्त्री यांना अटक करण्याच्या मागणीचे निवेदन ठाणेदार कठाळे यांना दिले.

यावेळी आ.विजय रहांगडाले, माजी आ.दिलीप बन्सोड, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जितेंद्र रहांगडाले, काँग्रेस तालुका अध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समिती संचालन रमेश टेंभरे, जि.प सदस्य जगदीश बावनथडे, पं.स. सदस्य जयप्रकाश पटले, किशोर दमाहे उपस्थित होते.

# गोंदियात डॉ.आंबेडकर जयंतीला पत्रकार उर्मिलेश आणि प्रा.आवाड येणार

## अरविंद माळी यांचं कॅडर कॅम्प



**गोंदिया :-** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या १३३ व्या जयंतीसाठी गोंदियात जय्यत तय्यारी सुरु झाली आहे. तारीख १४ आणि १५ एप्रिल रोजी आयोजित या दोन दिवशीय कार्यक्रमा दरम्यान विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. दरम्यान १४ एप्रिल रोजी आयोजित मुख्य कार्यक्रमात राज्यसभा ढ्त चे माजी कार्यकारी निदेशक आणि पत्रकार उर्मिलेश तसेच जवाहरलाल नेहरू युनिवर्सिटीचे प्रा. मिलिंद आवाड मुख्यवक्ता म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष जी. एल. तिरपुडे यांनी दिलेल्या माहिती नुसार जयंतीच्या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते कामाला लागले असून हा कार्यक्रम नगरपरिषद सुभाष शाळेच्या पटांगनावर होणार आहे. १३ एप्रिलच्या मध्यरात्री फटाक्याच्या लड्या फोडून अतिशबाजी करण्यात येईल. त्यांनतर सकाळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयंतीच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होईल. शहरातील प्रत्येक भागातून रॅली काढण्यात येणार असून फुले आंबेडकरी विचारधारेवर देखाव्यांचे प्रदर्शन घडविण्यात येणार आहे. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांचा स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात येईल. बालाघाट येथील प्रकाश सागर द्वारा प्रस्तुत भीमगीतांची मैफल, पत्रकार उर्मिलेश आणि प्रा. आवाड या मुख्य वक्त्यांचे प्रबोधन होणार आहे. दुसऱ्या दिवशी ता.१५ रोजी विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा, प्रसिद्ध विचारवंत अरविंद माळी यांचे कॅडर कॅम्प, बुद्धिमान अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना कॉम्पिटिशन परीक्षेचे मार्गदर्शन होणार असून रात्री मनोरंजनपर कार्यक्रमांतर्गत पुणे येथील प्रसिद्ध गायक संकल्प गोरे यांचा ऑर्केस्ट्रा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समितीचे अध्यक्ष जी. एल. तिरपुडे, उपाध्यक्ष अरविंद भावे, कोकिळा राहुलकर, कार्याध्यक्ष मनोज मेंढे, कार्यकर्ते स्वाती वालदे, मच्छिन्द्र भेलावे, स्विटी वैद्य, निरंजन डहाट, मनिषा गजभिये, आम्रपाली वनकर, अॅड अंजली चौरे, माया नागदीवे, निशा. मेश्राम, शायना पठाण, पृथ्वीराज कोल्हटकर आणि सिद्धार्थ रामटेके यांनी केले आहे.

# सीसीटीव्हीच्या माध्यमातून चोरट्याला पकडले शहर पोलिसांनी

**गोंदिया-** शहरातील गौतमनगर येथे घडलेल्या घरफोडीतील आरोपीला शहर पोलिसांनी ३० मार्च रोजी अटक केली. फरहान ईशाक कुरेशी (१९, रा.गौतमनगर) असे आरोपीचे नाव आहे.

गौतमनगर येथील दिनेश पुरनलाल मेश्राम सहकुटूंब बाहेरगावी गेले असता अज्ञात आरोपीने घराच्या दरवाज्याचे कुलूप तोडून आलमारीत ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख असा ५६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन पोलिस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे फरहान ईशाक कुरेशी याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरी गेलेल्या मुद्देमालापैकी सोन्याची नथ, लॉकेट, सोन्याची अंगठी असे २८ हजार रुपयांचे दागिने व ८ हजार रोख असा ३६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक चंद्रकांत सुर्यवंशी, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम, पोलिस हवालदार कवलपालसिंग भाटीया, जागेश्वर उईके, दीपक रहांगडाले, सुदेश टेंभरे, सतिश शेंडे, प्रमोद चव्हाण, निशिकांत लोंदासे, रिना चौव्हाण, पोलिस शिपाई दिनेश बिसेन, सुभाष सोनवाने, अशोक रहांगडाले, मुकेश रावते, कुणाल बारेवार यांनी केली.

# ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवार रिंगणात

**गोंदिया:** लोकसभा निवडणुकीत राजकीय आखाड्यात उतरलेल्या उच्चशिक्षीत उमेदवारांचा लढा रंगणार आहे.



रिंगणात असलेल्या १८ उमेदवारांत सात पदवीधर तर पाच पदव्युत्तर आहेत. यात डॉक्टर, वकील व अभियंत्यांचाही समावेश आहे. त्यामुळे आता कोणत्या मेरिटवर उमेदवारांना मतदान होते बघायचे आहे.

निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या उमेदवारांच्या शिक्षणाचा तपशील निवडणूक आयोगामार्फत उपलब्ध करुन देण्यात आला आहे. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात एकूण १८ उमेदवार रिंगणात आहेत.यातील ५० टक्के उमेदवार पदवीधर आहेत.

### उच्चशिक्षीतांचाही कल राजकारणाकडे

**उच्चशिक्षितांकडून नोकरी करणे व आपले जीवन जगणे हे अपेक्षित आहे. मात्र भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रातील चित्र बघता या अपेक्षेचा भंग झाला असून आता उच्चशिक्षीतांचा कलही राजकारणाकडे वाढल्याचे दिसते. कारण रिंगणात असलेल्या १८ उमेदवारांतील सात उमेदवार पदव्युत्तर आहेत. फक्त तीन उमेदवार बारावीच्या आतील आहेत.**

### कला शाखेतील चार पदवीधर

**रिंगणात असलेल्या १८ उमेदवारांपैकी चार उमेदवार कला शाखेतील पदवीधर आहेत. तर तीन अभियंतेही रिंगणात आपले भाग्य आजमावित आहेत. विशेष म्हणजे बारावीपर्यंत व आतील तीन उमेदवार रिंगणात असल्याने उच्चशिक्षीत सामान्यांत लढा रंगत आहे.**

### डॉक्टर व वकीलही मैदानात

**निवडणुकीच्या रिंगणात सेवानिवृत्त कर्मचारी आपले भाग्य आजमावित असतानाच पेशाने डॉक्टर व वकीलही आपले भाग्य आजमावित रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे अशा उच्च विद्या विभुषितांना मतदारांकडून काय प्रतिसाद मिळतो हे निकालातच स्पष्ट होणार.**

# मतदानाच्या दिवशी सर्व आस्थापनांना भरपगारी सुट्टी

**गोंदिया :** भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी २२ मार्च २०२४ च्या शासन परिपत्रकानुसार भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, यासाठी शासन परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या आदेशानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहणार आहे. उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांना या सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी लागणार आहे.

मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येणार आहे, अशा सूचनाही या आदेशाद्वारे देण्यात आल्या आहेत.

# धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर धाम बाबांना आक्षेपार्ह विधान भोवले, गुन्हा दाखल



**भंडारा :** बागेश्वर धाम बाबा त्यांच्या आक्षेपार्ह विधानामुळे ते पुन्हा एकदा वादात सापडले आहेत. मानव धर्माचें संस्थापक जूमदेव ठूब्रिकर यांच्या विरुध्द केलेले वादग्रस्त विधान धीरेंद्र शास्त्री अर्थात बागेश्वर बाबा यांना चांगलेच भोवले असून अखेर त्यांच्या विरोधात मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सूरजलाल अंबुले यांच्या तक्रारीवरून धीरेंद्र शास्त्रींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्याची देखील मागणी करण्यात येत आहे.

भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी शहरात धीरेंद्र शास्त्री म्हणजे बागेश्वर बाबा यांचा दिव्य दरबार २७ मार्चपासून २ एप्रिलपर्यंत चंदू बाबा स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी त्यांनी मानवधर्माचे संस्थापक जूमदेव ठूब्रिकर यांच्याविरुध्द आक्षेपार्ह विधान करत टीका केली. त्यामुळे लाखो अनुयायांची मनं दुखावल्या प्रकरणी भंडारा गोंदिया जिल्हयातील आणि विविध पोलीस ठाण्यांत धीरेंद्र शास्त्रींविरूद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मात्र आतापर्यंत फक्त मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अजूनही कुठली कारवाही झाली नसल्याने हजारोच्या संख्येनं अनुयायांनी भंडारा तुमसर मार्ग बंद करत पोलीस ठाण्यासमोरचा मार्गही बंद केला.

सत्संग मध्ये मानव धर्माचें संस्थापक जूमदेव ठूब्रिकर आणि त्यांच्या एका सेवकाबद्दल आक्षेपार्ह विधान केले आहे. त्यामुळे तेथील बाबा जुमदेव महाराज यांचे भक्त संतापले आहेत. बाबा जमुदेव महाराजांना मानणाऱ्या भाविकांनी बागेश्वर बाबांच्या विरोधात पोलिसात तक्रार देखील दाखल केली आहे. तसेच बागेश्वर बाबाला लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी देखील भक्तांकडून केली जात आहे. बागेश्वर धाम बाबा यांच्या वक्तव्याने लाखो सेवकांचे मन दुखावल्याने भंडारा, गोंदिया, नागपूर जिल्हयातील विविध पोलिस स्टेशन येथे धीरेंद्र शास्त्री यांच्या विरूद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. काल नागपूर, गोंदिया, भंडारा जिल्ह्यातील हजारोच्या संख्येने कार्यकर्ते आणि सेवकांनी मोहाडी पोलीस स्टेशन गाठले. त्यामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. अखेर परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलीस अधीक्षक लोहित मतानी यांनी आयोजक व धिरेंद्र शास्त्री यांच्या विरुध्द कलम २९५ कलम अन्तर्गत गुन्हा दाखल केला.

नेहमी वादग्रस्त विधान करून प्रसिद्धीच्या झोतात राहणारे बागेश्वर बाबा यांनी मोहाडीत बाबा जुमदेवजी आणि त्यांच्या सेवकांच्या विरोधात हनुमानजींच्या पुजेवरून भावना दुखावणारे वादग्रस्त विधान केले. यावेळी ते म्हणाले की, नागपूर आणि भंडारा या क्षेत्रामध्ये एका विशेष संप्रदायाला मानणारा वर्ग आहे. ते हनुमानजींना तर मानतात. मात्र, हनुमानजींची पूजा करणे मानत नाही. श्राद्ध करायचे नाही, माता पित्यांचे फोटो ठेवायचे नाहीत, राम राम बोलायचे नाही, जय गुरुदेव बोलाः. जो हनुमान संपूर्ण जीवनभर राम राम बोलला, त्यांचे उपासक राम राम नाही बोलणार. हद्द झाली यारः. रसगुल्ला खात आहेतः. मात्र शुगर असल्याचे सांगत आहेत. असे करणाऱ्या लोकांनी कान उघडून ऐकावे की, तुमचे पूर्वज नरकात गेले आहेत. तुमची येणारी पिढी पण नरकात जाईल. अशी भक्ती हनुमानजींना कधीच प्रिय नाही, असे वक्तव्य बागेश्वर बाबांनी भागवत सप्ताहात केले.

स्वतःच्या वक्तव्यावरून अडचणीत आल्याचे लक्षात येताच बागेश्वर बाबा यांनी पलटी खात मी कोणत्याही संतांच्या किंवा चांगले काम करणाऱ्यांच्या विरोधात नाही तसेच माझ्या प्रवचनात मी बाबा जुमदेव यांच्याबद्दल चुकीचे काहीही बोललो नाही असे ते म्हणाले. बाबा जूमदेव यांनी राज्यात नशामुक्तीसाठी अभियान राबविले, अंधश्रद्धा निर्मूलनसाठी बुलंद आवाज उठवला आणि सनातन धर्माच्या उत्थाणासाठी हनुमानाची उपासना केली ते बाबा जूमदेव महान त्यागी होते, त्यामुळे मी त्यांच्या विरोधात बोलू शकत नाही अशी स्पष्टोक्ती काल त्यांनी दिली. त्याच प्रमाणे, मी काल जुमदेव बाबांचे मानसपुत्र रमेशबाबु यांच्याशी बोललो असून त्यांनी सांगितले की, यात काही लोक राजकारण करीत आहेत , बाबा जुमदेव यांनी कधीही आई वडीलांची पूजा करण्याचा विरोध केला नसल्याचे त्यांनी सांगत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या वक्तव्यामुळे दुखावलेल्या हजारो भक्तांनी त्यांच्या अटकेची मागणी लावून धरली आहे. या प्रकरणात आज काय कारवाई केली जाईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गोरेगाव येथे दोघाविरुध्द गुन्हा दाखल

परमात्मा एक सेवक महानुभाव पंथाचे संत जुमदेवबाबा यांच्याविरुध्द अवमानजनक संदेश सोशल मिडियावर प्रसारित करुन परमात्मा एक सेवकांच्या भावना दुखावल्याचे प्रकरण गोरेगाव पोलीस ठाणे अंतर्गत कटंगी बु.येथे घडले.सदर प्रकरणाची दखल घेत सेवकांनी गोरेगाव पोलीस ठाणे गाठून जुमदेवबाबा यांच्याविरुध्द अवमानजनक संदेश समाजमाध्यमावर प्रसारित करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी लावून धरली.सदर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत व सेवकांची गर्दी पोलीस ठाण्यात वाढत असल्याचे बघून पोलीस निरिक्षक अजय भुसारी यांनी कटंगी बु.येथील दोन युवकाविरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली.

# बोरवेलमध्ये पडून "त्या" बालकाच्या मृत्यूस शेतमालक दोषी

**गोंदिया :** सडक अर्जुनी तालुक्यातील राका/पळसगाव येथे ९ मार्च २०१६ रोजी शेतशिवारातील खोदलेल्या बोरवेलमध्ये ३ वर्षीय बालकाचा पडून मृत्यू (Child's death) झाला. या बालकाच्या मृत्यूस शेतमालकाचा दुर्लक्षितपणा कारणीभूत असल्याचा ठपका दिवाणी न्यायाधिश सडक अर्जुनी यांनी ठेवला. दरम्यान या प्रकरणातील शेतमालक भावडांना न्यायालयाने दोषी ठरवून दोन महिन्याचा कारावास ठोठावला आहे. उल्लेखनिय असे की, यातील एका आरोपीचा आधीच मृत्यू झाला आहे तर दुसरा आरोपी ७४ वर्षाचा आहे. रामकृष्ण श्रावण चांदेवार असे हयात असलेल्या आरोपीचे नाव आहे.

सविस्तर असे की, सडक अर्जुनी तालुक्यातील राका/ पळसगाव येथील रामकृष्ण चांदेवार व त्यांचा मुलगा देवराम चांदेवार यांनी शेतात आपल्या मालकीच्या जागेत बोरवेल खोदकाम केले होते. मात्र बोरवेलवर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात आली नाही.

९ मार्च २०१६ रोजी विक्की खुशाल दोनोडे (३ वर्ष ३ महिने) हा खेळता खेळता बोरवेलच्या खड्ड्यात पडला. यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. काही दिवसांपूर्वीच देशात प्रिंस नावाचा बालक खड्ड्यात पडला होता. त्याला सुखरूप बाहेर काढण्यात एनडीआरएफला यश आले होते. त्यामुळे विक्कीला खड्ड्यातून बाहेर काढण्यासाठी यंत्रणेकडून कसोसीचे प्रयत्न करण्यात आले. जवळपास तीन ते चार दिवस एनडीआरएफच्या पथकाने प्रयत्न करून विक्कीला बोरवेलमधून काढण्यात आले.

मात्र त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची नोंद फिर्यादी सिंधू नारायण दोनोडे हिच्या तक्रारीवरून डुग्गीपार पोलिस ठाण्यात करण्यात आली. यातील आरोपी रामकृष्ण चांदेवार, देवराम श्रावण चांदेवार यांच्यासह त्यांच्या कुटूंबियाविरूध्द कलम ३३६, ३०४ (अ), ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पूर्ण करून पोलिसांनी दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले. या बहुचर्चित प्रकरणात सरकारी वकील ओ.एस.गहाणे यांनी न्यायालयासमक्ष एकूण १२ साक्ष तपासले.

दरम्यान न्यायाधिश डॉ.विक्रम आव्हाड यांनी मुख्य आरोपी रामकृष्ण श्रावण चांदेवार, देवराम चांदेवार या दोघांच्या दुर्लक्षितपणामुळेच विक्की दोनोडे याचा मृत्यू झाल्याने दोषी ठरविले. या प्रकरणी न्यायालयाने दोन्ही आरोपींनी दोन महिन्याचा तुरूंगवास व ७०० रूपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. उल्लेखनिय असे की, देवराम श्रावण चांदेवार या आरोपीचा मृत्यू झाला आहे. तर शिक्षेस रामकृष्ण श्रावण चांदेवार हा पात्र ठरला आहे.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलिस अधिकारी केंद्रे यांनी केले होते. न्यायालयात पोलिसांकडून भारत रामटेके यांनी कामकाज पाहिले.बोरवेल मृत्यू प्रकरणात मुख्य आरोपी रामकृष्ण श्रावण चांदेवार, देवराम श्रावण चांदेवार या दोघांसह आणखी दोन आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाच्या निर्वाळ्यात न्यायालयाने या दोन्ही आरोपींशिवाय इतर दोन आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष सुटका केली आहे.

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स



लोकसभा २०२४ रणसंग्राम
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक बुधवार, दि.३ एप्रिल २०२४





# अंध मतदारांच्या सोयीसाठी ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी-एस.चोक्कलिंगम



**मुंबई :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदारांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून या अंतर्गत अंध मतदारांच्या सुलभतेसाठी त्यांना ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी (Braille Voter Information Slip)उपलब्ध करुन देणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी येथे दिली.

मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ येथे लोकसभा निवडणूक २०२४ च्या तयारीबाबत माहिती देण्यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत श्री. चोक्कलिंगम बोलत होते. यावेळी सह सचिव व अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (माहिती) डॉ.राहूल तिडके, सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, अवर सचिव तथा उप निवडणूक अधिकारी शरद दळवी उपस्थित होते.

यावेळी श्री. चोक्कलिंगम यांनी सांगितले की, राज्यातील एकुण मतदारांच्या संख्येमध्ये सद्यस्थितीत अंदाजे १,१६,५१८ अंध मतदार आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता अंध मतदारांच्या सुलभतेसाठी त्यांना ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी (Braille Voter Information Slip)उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच भारत निवडणूक आयोगाने ४०% दिव्यांगत्व असलेले दिव्यांग व ८५ वयावरील जेष्ठ नागरिकांमधील इच्छुक मतदारांना १२-डी अर्जान्वये गृह मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार राज्यभरातून दि. २८ मार्चपर्यंत ८५ वयावरील जेष्ठनागरिक यामध्ये १७ हजार ८५० मतदारांचे तसेच ४०% दिव्यांगत्व असलेले ५ हजार ४५३ दिव्यांग मतदारांचे १२ डी चे अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच अत्यावश्यक सेवा यामधील ५३ मतदारांचे २८ मार्च पर्यंत १२ डी चे अर्ज प्राप्त झाले आहेत.

भारत निवडणूक आयोगाकडून नोंदणीकृत अपरिचित राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांसाठी या निवडणूकीत १९० अंतिम मुक्त चिन्हे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत तसेच भारत निवडणूक आयोगाने राज्यामध्ये सहा राष्ट्रीय मान्यताप्राप्त राजकीय पक्ष आणि चार राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष यांना मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे राज्यभरामध्ये विविध राजकीय पक्षांच्या २४१ एवढ्या प्रमुख प्रचारकांना परवानगी देण्यात आली आहे.

राजकीय पक्षामार्फत प्रचार प्रसिद्धीकरिता माध्यमांमार्फत दिल्या जाणाऱ्या जाहिरातीचे / पोस्टर/ ऑडियो-व्हिडियो/ संदेश यांचे पुर्व प्रमाणिकरण करण्यासाठी राज्यस्तरीय माध्यम देखरेख व संनियत्रण समिती व अपिलिय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीकडे पूर्व प्रमाणिकरणासाठी (PRE CERTIFICATION) साठी दोन राजकीय पक्षांचे दोन अर्ज प्राप्त झाले असून कार्यवाही पूर्ण झाली असल्याची माहिती श्री.चोक्कलिंगम यांनी यावेळी दिली. तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने राज्यभरातील ४८ लोकसभा मतदार संघामध्ये अवैध रोख रक्कम, दारु, ड्रग्ज इ. जप्त करण्यासाठी १ हजार ६५६ Flying Squad Team (FST) व २०९६ Static Surveillance Team (SST) स्थापन करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्यासाठी विशेष निरिक्षक (Special General Observer) म्हणून निवृत्त आयएएस अधिकारी श्री.धर्मेंद्र एस गंगवार व विशेष पोलिस निरिक्षक (Special PoliceObserver) म्हणून निवृत्त आयपीएसअधिकारी श्री.एन. के. मिश्रा यांची नियुक्ती केली आहे. राज्यामध्ये या निवडणूकीसाठी ९८ हजार ११४ इतक्या मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

कायदा व सुव्यवस्थायंत्रणेमार्फत दि. २८ मार्च पर्यंत २७,७४५ शस्त्रास्त्रे जमा करण्यात आली आहेत तसेच १९० शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. परवाना नसलेली ५५७ शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत. तसेच राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून CRPC कायद्यांतर्गत २७,६८५ इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

## राज्यभर अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या जप्तीची माहिती

राज्यामध्ये दि. १ ते २८ मार्च या कालावधीत राज्यातील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारु, ड्रग्ज व मौल्यवान धातु इ. बार्बीच्या जप्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जप्तीची बाब | परिमाण | रक्कम (कोटी मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | रोख रक्कम | | ३३.१२ |
| २ | दारु | २३,४२,३६० लिटर | १९.३४ |
| ३ | ड्रग्ज | ८,६८,७७२ ग्राम | १८६.०० |
| ४ | मौल्यवान धातू | ८१,८०२ ग्राम | ४०.२३ |
| ५ | फ्रिबीज | ४,५६८ (संख्या) | ०.४२ |
| ६ | इतर | ६,३३,६९२ (संख्या) | ६३.१७ |
| एकुण | | | ३४२.२९ |

महाराष्ट्रातील पहिल्या टप्प्यातील पाच मतदार संघासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण पाच सर्वसाधारण निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच एकुण तीन पोलिस निरिक्षकांची आणि सहा खर्च निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पहिल्या टप्प्यातील पोस्टल बॅलेट (Electronically Transmitted Postal Ballet Systeт (ETPBS) द्वारेमतदान करणाऱ्या मतदारांची एकुण संख्या ९ हजार ४१६ इतकी आहे यामध्ये रामटेक १ हजार ८६७, नागपूर १ हजार ००१, भंडारा-गोंदिया ३ हजार २११, गडचिरोली-चिमूर १ हजार ४८३ व चंद्रपूर १ हजार ८५४ इतके मतदार पोस्टल बॅलेटद्वारे मतदानाचा हक्क बजावणार आहे.




## ५२ मतदान केंद्र वाढले

- भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात तुमसर, भंडारा, साकोली, अर्जुनी, तिरोडा व गोंदिया या ६ विधानसभा क्षेत्राचा समावेश आहे.
- १० वर्षात २ लाख मतदार वाढल्यामुळे ५२ मतदान केंद्र वाढले आहेत.
- २०१४ मध्ये या क्षेत्रात २ हजार ७१ मतदान केंद्र होते. आता २०२४ मध्ये २ हजार १३३ मतदान केंद्र आहेत.

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूक-२०२४ च्या पहिल्या टप्प्यात विदर्भातील ०५ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक १९ एप्रिलरोजी मतदान घेण्यात येणार आहे. या निवडणूकीसाठी रामटेकमध्ये एकुण ३५ उमेदवार पात्र ठरले त्यापैकी ७ जणांनी माघार घेतल्याने अंतिम उमेदवारांची संख्या २८ आहे, नागपूर मध्ये अंतिम उमेदवार २६ आहेत, भंडारा-गोंदीया मध्ये २२ उमेदवारांपैकी ४ जणांनी माघार घेतली असून अंतिम उमेदवारांची संख्या १८ आहे, गडचिरोली-चिमूर मध्ये १२ उमेदवारांपैकी २ जणांनी माघार घेतली असून अंतिम उमदेवारांची संख्या १० तर चंद्रपूर मध्ये अंतिम उमेदवार १५ आहेत.

## पहिल्या टप्प्यात ०५ लोकसभा मतदारसंघातील मतदारांचा तपशिल

निवडणूकीमध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकास मतदार नोंदणीची प्रक्रीया थांबविण्यात येते व मतदार यादी अंतिम करण्यात येते. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील पाच लोकसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी दि. २७.०३.२०२४ रोजी थांबविण्यात आली आहे व या निवडणूकीसाठी मतदारांचा तपशिल खालीलप्रमाणे अंतिम करण्यात आलेला आहे.

| क्र. | मतदार संघाचे नाव | पुरुष मतदार | महिला मतदार | तृतीयपंथी मतदार | एकुण | मतदान केंद्रे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९- रामटेक | १०,४४,८९१ | १०,०४,१४२ | ५२ | २०,४९,०८५ | २,४०५ |
| २ | १० - नागपुर | ११,१३,१८२ | ११,०९,८७६ | २२३ | २२,२३,२८१ | २,१०५ |
| ३ | ११- भंडारा-गोंदिया | ९,०९,५७० | ९,१७,६०४ | १४ | १८,२७,१८८ | २,१३३ |
| ४ | १२-गडचिरोली-चिमुर | ८,१४,७६३ | ८,०२,४३४ | १० | १६,१७,२०७ | १,८९१ |
| ५ | १३-चंद्रपुर | ९,४५,७३६ | ८,९२,१२२ | ४८ | १८,३७,९०६ | २,११८ |
| एकूण | | ४८,२८,१४२ | ४७,२६,१७८ | ३४७ | ९५,५४,६६७ | १०,६५२ |

मतदारांचा तुलनात्मक तपशील या पाच लोकसभा मतदार संघातील सन २०१४ व सन २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांमधील मतदारांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | मतदार संघाचे नाव | २०१४ मधील मतदार संख्या | २०१९ मधील मतदार संख्या | २०२४ मधील मतदार संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ९- रामटेक | १६,७७,२६६ | १९,२२,७६४ | २०,४९,०८५ |
| २ | १० - नागपुर | १९,००,७८४ | २१,६१,०९६ | २२,२३,२८१ |
| ३ | ११- भंडारा-गोंदिया | १६,५५,८५२ | १८,११,५५६ | १८,२७,१८८ |
| ४ | १२-गडचिरोली -चिमुर | १४,६८,४३७ | १५,८१,३६६ | १६,१७,२०७ |
| ५ | १३-चंद्रपुर | १७,५३,६९० | १९,१०,१८८ | १८,३७,९०६ |

वयोगटानुसार मतदार संख्या

| क्र. | मतदार संघाचे नाव | १८-१९ | २०-२९ | ३०-३९ | ४०-४९ | ५०-७९ | ८० + |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९- रामटेक | ३१,७२५ | ३,८३,२७ | ६४,९०,३३९ | ४,७६,९७१ | ६,२०,३६१ | ४६,४१३ |
| २ | १० - नागपुर | २९,९१० | ३,३७,९६१ | ५,०६,३७२ | ५,०७,६४० | ७,७०,७०० | ७०,६९८ |
| ३ | ११- भंडारा-गोंदिया | ३१,३५३ | ३,६६,५७० | ३,९९,११५ | ३,९८,७४९ | ५,९३,१३२ | ३८,२६९ |
| ४ | १२-गडचिरोली -चिमु | २४,०२६ | ३,२८,७३५ | ३,५६,९२१ | ३,४८,५८५ | ५,२५,३८१ | ३३,५५९ |
| ५ | १३-चंद्रपुर | २४,४४३ | ३,४२,७८७ | ४,२५,८२९ | ४,२०,९६५ | ५,८६,४०२ | ३७,४८० |

## लोकसभा निवडणूकीचा दुसरा टप्प्याबाबतची माहिती

दुसऱ्या टप्प्यात विदर्भातील ०५आणि मराठवाडा विभागातील ०३ अशा एकूण ०८ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक२६ एप्रिलरोजी मतदान घेण्यात येणार आहे. त्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया २८ मार्च रोजी सुरु झाली असून ४ एप्रिल नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. ५ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्र छाननी करण्यात येईल तर दि. ८ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.

दुसऱ्या टप्प्यातील ०८ लोकसभा मतदारसंघातील मतदारांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | पुरुष मतदार | महिला मतदार | तृतीयपंथी मतदार | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०५- बुलढाणा | ९,३२,२०८ | ८,४८,५७३ | २४ | १७,८०,८०५ |
| २ | ०६ - अकोला | ९,७७,००७ | ९,१२,७३१ | ४५ | १८,८९,७८३ |
| ३ | ०७- अमरावती | ९,४३,२६३ | ८,९०,७०५ | ८५ | १८,३४,०५३ |
| ४ | ०८- वर्धा | ८,५६,८१३ | ८,२२,५१३ | १३ | १६,७९,३३९ |
| ५ | १४- यवतमाळ - वाशिम | १०,०१,३९० | ९,३७,२८३ | ६४ | १९,३८,७३७ |
| ६ | १५ - हिंगोली | ९,४६,००४ | ८,७०,३०२ | २४ | १८,१६,३३० |
| ७ | १६ -नांदेड | ९,५४,१६२ | ८,९५,६२५ | १४२ | १८,४९,९२९ |
| ८ | १७ -परभणी | ११,०२,५२९ | १०,१७,७७७ | २६ | २१,२०,३३२ |

### मतदानासाठीपुढील १२ पैकीकोणताही एक ओळखीचा पुरावा आवश्यक

आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक / पोस्ट ऑफिसने जारी केलेले फोटोसह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, पॅनकार्ड, छ्रझठ अंतर्गत ठक्ष्ख द्वारे जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र / राज्य सरकार / झडण / झीलश्रळल्ल ड्ळाळींशव कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेली छायाचित्र असलेली सेवा ओळखपत्र, खासदार/ आमदार/ MLC यांना जारी केलेली अधिकृत ओळखपत्र, अद्वितीय अपंगत्व आयडी (णऊखऊ)कार्ड, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण, भारत सरकार. सदर माहिती मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदीचे ईडी व सीबीआय हे कार्यकर्ते- नाना पटोले

**गोंदिया :** राष्ट्रवादीचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांना विमान घोटाळा प्रकरणी सीबीआयनं क्लीनचीट दिली आहे. त्यामुळं पटेल यांना दिलासा मिळाला आहे. सीबीआयने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात या याप्रकरणी क्लोजर रिपोर्ट दाखल केला. सन २०१७ मधील एका भ्रष्टचार प्रकरणात प्रफुल्ल पटेल यांच्याविरोधात कोणताही सबळ पुरावा नसल्याचं सीबीआयनं कोर्टात सांगितलं आहे. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रफुल पटेल यांना टोला लावला असून ते वाशिंग मशीन मध्ये गेले आहेत. त्यामुळे स्वाभाविक आहे जे व्हायचं ते होणारच होतं असं म्हटलं आहे.



देशात गेल्या १० वर्षापासून ईडी आणि सीबीआय हे नरेंद्र मोदी यांचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे जे तिकडे गेले त्यांना माफी मिळणारच आहे. असे नाना पटोले म्हणाले. तिरोडा येथील जुनी नगर परिषद ग्राउंड वर गुरुवारी प्रचार सभा घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधत ते बोलत होते. पटोले म्हणाले की पुढील काही दिवसात त्यांना इकबाल मिरची प्रकरणातून पण क्लिनचिट मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. हे समजण्यास पण आता हरकत नाही.

लोकांमध्ये मोदी सरकार विरोधात प्रचंड राग आहे. शेतकरी, तरुण, छोटा व्यापारी ,सर्व सामान्य जण यांच्या मनात राग आहे.त्यामुळे पुढील निवडणुकीत हे १५० पार जाणार नाहीत. यांना सत्तेतून जनताच बाहेरचा मार्ग दाखविणारा अशी टीका काँग्रेस पक्षातील प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. या प्रसंगी गोंदिया भंडारा लोकसभा काँग्रेस उमेदवार डॉ. प्रशांत यादवरावजी पडोळे,माजी मंत्री सतिश चतुर्वेदी,माजी खासदार खुशालचंद्र बोपचे,माजी आमदार दिलीप बनसोड,रविकांत बोपचे आदि उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीत किती झाले होते नोटा मतदान

**गोंदिया:** २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात नोटाला चांगली मते मिळाली होती. यात १० हजार ५२४ मतदारांनी नोटावर आपली मोहोर उमटविली होती. परिणामी नोटांच्या मतदानालाही महत्व आल्याचे दिसून येते. एवढ्या मतदारांनी उमेदवारला नाकारल्याचेही समजते. निवडणुकीत उभे राहिलेल्या एकूण उमेदवारांपैकी कोणत्याही उमेदवारास मदाराला जर मतदान करायचे नसेल तर दिलेल्या उमेदवारांपैकी कुणालाही पसंती न देता नोटाचे बटन दाबण्याचे अधिकारही लोकशाही प्रणाली व्यवस्थेत करुन देण्यात आले आहे.

**१०,५२४ मतदारांचे नोटाला मतदान**

२०१९ मध्ये एकूण १० हजार ५२४ नोटाला मतदान झाले होते. यात ११२ पोस्टल मतातून नोटावर मोहोर उमटविण्यात आली होती.

**भंडारा विधानसभा क्षेत्रात सर्वाधिक नोटा**

२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत सहा विधानसभा क्षेत्रातील भंडारा विधानसभा क्षेत्रातून सर्वाधिक नोटाला मतदान झाले होते. यात १९६८ एवढी मते नोटाला मिळाली होती. यानंतर गोंदिया विधानसभा क्षेत्राचा क्रमांक लागतो. तिथे १८६५ मते नोटाला मिळाली होती.

# 'अन् शहरातील भिंतीही बोलक्या झाल्या,मतदान करा'

## स्वीप सेलचे अभिनव उपक्रम : विविध माध्यमांचा कल्पकतेने वापर करुन मतदार जागृती




**गोंदिया :** मतदारांनी आपल्या मताधिकाराचा वापर करावा, यासाठी स्वीप सेलच्या माध्यमातून मतदान जागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शहरातील भिंतीवर रंगविण्यात आलेले विविध संदेश मतदारांना चांगलेच आकृष्ट करीत असून भिंतीही आता मतदान करण्याविषयी बोलू लागल्या आहेत.

जिल्हा निवडणूक अधिकारी व मतदार जागृती अभियान (स्वीप सेल) यांनी विविध माध्यमांचा कल्पकतेने वापर करुन शहरातील विशेषतः जयस्तंभ चौकातील प्रशासकीय इमारतीच्या भिंतीवर अतिशय सुंदर व नेमका अर्थ सांगणारे संदेश अंकित केले आहेत. नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान करावे असे आवाहन या संदेशात आहे. या सोबतच शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, पथनाट्य, जिंगल्स, रिल्स, चावडी भेट, वाड्या वस्त्यांमध्ये सुद्धा नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले जाते आहे. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जिल्हा प्रशासनाने अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम अभियान राबविले आहेत.

मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. ते कर्तव्य प्रत्येक व्यक्तीने बजावले पाहीजे. मात्र, मतदान करण्याविषयी अनेक व्यक्तींमध्ये अनास्था दिसून येते. जिल्ह्यातील सर्व वयोगटातील व्यक्तींनी मतदानाचा हक्क बजवावा यासाठी जिल्ह्यात मस्वीप सेलफच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. स्वीप सेलच्या माध्यमातून दिव्यांग, वयोवृध्द, नवमतदार, तृतीय पंथी व्यक्तींपर्यत पोहचून सर्वांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले. शिवाय विविध माध्यमांचा वापर करीत आता थेट जिल्ह्यातील सर्वच मतदारांपर्यत पोचण्यात येत आहे. विविध शासकीय उपक्रमात मतदान करण्याविषयी प्रतिज्ञा घेण्यात येत आहेत.

जिल्ह्यातील विविध शासकीय इमारत परिसरात मतदान जागृतीबाबतचे पोस्टर चिटकविण्यात आले आहेत. मुलांनी आपल्या पालकांना मतदान करण्याविषयी सांगावे यासाठी मबालकांचे पालकांना पत्रफ हा अभिनव उपक्रम सर्वच शाळांमध्ये राबविण्यात आला. शिवाय मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या निबंध, चित्रकला, रांगोळी स्पर्धा सुध्दा घेण्यात आलेल्या आहेत. यात शालेय विद्यार्थ्यांनी हिरहिरीने सहभाग नोंदविला. दरम्यान जिल्ह्यातील सर्वच विधानसभा क्षेत्रात भिंतीचित्र काढण्यात आले. हे भिंतीचित्र प्रत्येक व्यक्तीला आकृष्ट करीत आहेत.

उल्लेखनीय म्हणजे, जिल्ह्यातील मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वीपचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. यांच्या संकल्पनेतून महयूमन चेनफ तयार करण्यात आली. याला नागरिकांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांचे काव्य वाचन, गीत गायन, मतदान जागृतीपर भाषण, नागरिकांचे तथा नवमतदारांचे मनोगत सामाजिक माध्यमांवर अधिकच जागृती करीत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, विविध शाळांमध्ये नाटीका सुध्दा तयार करण्यात आल्या असून त्यांचे सामाजिक माध्यमातून सादरीकरण केले जात आहे.

विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व पटवून त्यांच्या पालकांना मतदान करण्यासाठी जागृत करण्यावर भर देण्यात येत आहे. त्या सर्व उपक्रमात 'चुनाव की पाठशाला' हा उपक्रम देखील मनोरंजनासह मतदारांमध्ये जागृती निर्माण करणारा ठरत आहे. जिल्ह्यातील आदिवासी बहुल आणि मागास भागात अधिकाधिक मतदान व्हावे यासाठी जिंगल्स तयार करण्यावर देखील स्वीप सेलचा भर असून चावडीवरील बैठका, स्लम क्षेत्रात नागरीकांना मार्गदर्शन, युवकांच्या बैठका, शासकीय कार्यक्रमांतील आवाहनावर देखील भर देण्यात येतो.

स्वीप सेलचे विविध कार्यक्रम स्वीपचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. यांच्या मार्गदर्शनात घेण्यात येत असून सहायक नोडल अधिकारी शिखा पिपलेवार चांगलेच परिश्रम घेत आहेत. मतदारांच्या जनजागृतीसाठी हे कार्यक्रम राबविण्यात येत असून नागरिकांनी आपल्या मताधिकारांचा वापर करावा. जिल्ह्यातील प्रत्येक गावात, शहरात शंभर टक्के मतदान होईल, यासाठी सर्वांनीच प्रयत्नशिल राहावे, मतदानाचे आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन स्वीप सेलचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. यांनी केले आहे.

# बसपाने दुसऱ्यांदा दिला तेली समाजाचा उमेदवार!

## गेल्या ४ लोकसभा निवडणुकांत बसपने ५० हजाराच्यावरच घेतले मतदान



**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया-** पूर्व विदर्भातील भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षांच्या उमेदवारांतच लढत होणार असल्याचे चित्र जरी असले तरी बसपाने तेली समाजाच्या भाजप नेत्याला उमेदवारी दिल्याने निवडणुकीत चुरस निर्माण होण्याचे चित्र नाकारता येत नाही. कारण भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात भाजप काँग्रेस राष्ट्रवादीने आजपर्यंत लोकसभेची उमेदवारी (पोवार-कुणबी वगळता) इतरांना दिलेली नाही.तर बहुजन समाज पक्षाने मात्र दुस?यांदा या मतदारसंघात तेली समाजाचा उमेदवार रिंगणात उतरवलेला आहे.या समाजाची मते लक्षणीय(जवळपास २.५०-३ लाख) आहेत. ती मते कितपत बसपकडे वळविण्यात उमेदवार यशस्वी होते,आणि हत्तीची चाल कोणत्या दिशेने राहते, यावर या निवडणुकीतील विजयी होणाऱ्या उमेदवाराच्या मताधिकाच्या निकाल अवलंबून राहणार आहे.




२०१९ च्या निवडणुकीत भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात भाजपने मोदी लाटेत सहज विजय मिळवला. तीच परिस्थितीही सध्याच्या घडीला दिसून येत असली तरी भारतीय जनता पक्षाच्या महामंत्री असलेल्या व्यक्तीला उमेदवारी बसपाच्या वतीने मिळाल्याने निवडणुकीत व्टि्स्ट आला आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत लोकसभेच्या झालेल्या निवडणुका जातीय समीकरणातच झाल्या आहेत. या निवडणुकांमध्ये जातीय समीकरण आणि तिसऱ्या सक्षम उमेदवाराची भूमिका ही महत्त्वपूर्ण राहिली आहे. बहुजन समाज पक्षाच्या उमेदवाराचा आढावा घेतल्यास २००४ पासूनच्या प्रत्येक लोकसभा निवडणुकीत ५० हजाराच्यावर मते घेतली आहेत.२००४ च्या लोकसभा निवडणुकीत तर बसपने लोधी समाजाचे अजाबराव शास्त्री यांना उमेदवार केले, त्यांनी तब्बल ९० हजार मते घेतल्याने प्रफुल पटेलांना भाजपच्या शिशुपाल पटलेकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर २००९ च्या लोकसभा निवडणुकीत कलार समाजाचे विरेंद्रकुमार जायस्वाल यांना उमेदवारी दिली,त्यांनीअ६८२४६ मते घेतली होती. २०१४ मध्ये बसपने तेली समाजाचे उमेदवार संजय नासरे यांनाा उमेदवारी दिली, त्यांनी ५०९५८ मते घेतली. तर २०१९ च्या निवडणुकीत (सासर माळी/ माहेर कुणबी) डॉ.विजया राजेश नंदुरकर यांनी उमेदवारी दिली, त्यांनी ५२६५९ मते मिळवली होती. या चारही लोकसभा निवडणुकीत बसपच्या उमेदवाराला मिळालेली मते हि ५० हजाराच्यावरील असल्याने बसपचा मतदाराचा आकडा हा ठराविक आकड्यापर्यंत पोचत असल्याचे स्पष्ट होते.आता परत दुसऱ्यांदा तेली समाजाला बसपने उमेदवारीत प्राधान्य दिले आहे. बसप उमेदवाराला मिळालेल्या त्या मताव्यतिरिक्त आपल्या स्वबळावर अधिक मत घेणारा उमेदवार अजाबराव शास्त्रीसारखा मिळाला तर १ लाखापर्यंत मत घेण्याची क्षमता बसपमध्ये आहे, हे नाकारता येत आहे.

भाजपने (BJP) विद्यमान खासदार सुनील मेंढे यांना दुसऱ्यांदा संधी दिली, तर काँग्रेसने नवा गडी, नवा डाव हे सूत्र लावत डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी दिली. मात्र, उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी बहुजन समाज पार्टीने संजय कुंभलकर यांना उमेदवारी देत निवडणुकीत ट्विस्ट आणला आहे. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात बसप हा नवीन चेहऱ्यांना संधी देणारा पक्ष म्हणून ओळखला जात आहे, बसपने आपला उमेदवार परत कधीच रिंगणात उतरवलेला नाही.

३१ मार्चपासून खऱ्या अर्थाने प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. यात मतदारांच्या मनात घर करुन त्याचे मतांमध्ये रूपांतर करण्यात कोण यशस्वी ठरतो, हे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या मतदारसंघात भाजप व काँग्रेसमध्ये लढत होणार असली तरी बसपाचे उमेदवार संजय कुंभलकर यांच्या उमेदवारीनंतर या लढतीत चुरस वाढण्याची शक्यता आहे. यात जातीय समीकरण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात कुणबी, पोवार, तेली समाजाची सर्वाधिक मते आहेत. या तिन्ही समाजांच्या मतांच्या समीकरणावरच विजयाचे बरेच समीकरण अवलंबून असले तरी कुणबी समाज हा उमेदवार बघून मतदानाचा निर्णय घेणारा समाज आहे. तर पोवार समाज मात्र हा सर्वाधिक ८५ टक्के भाजपसोबत असल्याने तो मतदानाच्यावेळी तो समाजापेक्षा पक्षाशीच बांधिल असल्याचे आजपर्यंतचे चित्र आहे. त्यात दुसऱ्यांदा तेली समाजाचा उमेदवार हा राष्ट्रीय पार्टीकडून रिंगणात असल्याने काय समीकरण तयार होतात,हे बघावे लागणार आहे.